RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती
१ रविवार
मार्च २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २७५
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!

धमाका ऑफर

३ दिवस मोफत!

तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी?
मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!
१ दिवसाच्या जाहिरातीवर
३ दिवस मोफत!
कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.
घाई करा! ही संधी सोडू नका.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:
9975532291/9096945629

## बँकेतील नोटा घेऊन जाणारे विमान कोसळले; १५ ठार

**▸विदर्भ केसरी।बोलिव्हिया**

– बोलिव्हियाच्या राजधानीजवळ शुक्रवारी पैसे घेऊन जाणारे एक मालवाहू विमान कोसळले. त्यामुळे महामार्गावरील सुमारे १२ वाहनांचे नुकसान झाले. विमान कोसळल्यानंतर नोटा जमिनीवर विखुरल्या गेल्या होत्या. या अपघातात १५जणांचा मृत्यू झाला. यात अनेकजण जखमी झाले आहेत.

पंधरा जणांचा मृत्यू – 'रॉयटर्स'च्या वृत्तानुसार, शुक्रवारी संध्याकाळी बोलिव्हियाची राजधानी ला पाझजवळील एल अल्टो शहरात खराब हवामानामुळे एक विमान कोसळले. देशाच्या मध्यवर्ती बँकेतून नवीन नोटा घेऊन जाणारे बोलिव्हियन एअर फोर्स हर्क्युलस विमान एका वर्दळीच्या रस्त्यावर कोसळल्याने पंधरा जणांचा मृत्यू झाला. यात किमान ३० जण जखमी झाले आहेत.

## सेल्फीच्या नादात अभियंत्याचा बुडून मृत्यू

**▸विदर्भ केसरी। नांदेड :**

नांदेडमधील एका अभियंत्याचा सेल्फी घेण्याच्या नादात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. कंधार तालुक्यातील मन्याड नदीला असलेले पाणी पाहून अभियंत्याला स्वतःच्या मनावर ताबा ठेवता आला नाही आणि त्याने सेल्फी घेताना त्याचा तोल गेल्याने आणि जीव गमावला. ही दुर्दैवी घटना गुरुवारी (दि. २६) सायंकाळी घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, मुखेड तालुक्यातील रावणकोळा गावचे रहिवासी असलेले अविनाश किशनराव हांडे (३४) हे अनुकंपा तत्वावर कंधार येथे सार्वजनिक बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंतापदी आठ महिन्यांपूर्वीच रुजू झाले होते. गुरुवारी सायंकाळी नांदेड येथून कामकाज आटोपून परत किवळा बहाद्दरपुरामार्गे उदगीरला जात असताना सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास मन्याड नदीतील पाणी पाहून त्यांना सेल्फी काढण्याचा मोह झाला.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयावर धडकला शेतकऱ्यांचा जनसागर

**▸विदर्भ केसरी।**

भंडारा जिल्ह्यातील धान खरेदीच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांचा संताप आता अनावर झाला आहे. धान खरेदीचे उद्दिष्ट वाढवणे, रखडलेले चुकारे आणि बोनसच्या मागणीसाठी भारतीय किसान संघाच्या नेतृत्वात काल, २७ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनाने प्रशासनाचे धाबे दणाणले असून, शेतकऱ्यांनी सरकारला ८ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या मोर्चाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ शेतकरीच नव्हे, तर अडचणीत सापडलेले धान खरेदी केंद्र चालकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांनीही या मोर्चात प्रत्यक्ष सहभागी होऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांना आपला जाहीर पाठिंबा दर्शविला. "शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही," असा सूर यावेळी उमटला.

# युद्ध भडकले!

## इस्रायल-अमेरिकेचा इराणवर मोठा हल्ला, स्फोटात ५१ शाळकरी मुलींचा बळी

**▸विदर्भ केसरी।**

**इस्रायल-अमेरिकेने इराणमधील साधारण ३० विविध ठिकाणांना लक्ष्य करत भीषण हवाई हल्ले केले आहेत. या लष्करी कारवाईदरम्यान इराणमधील एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात ५१ विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**



- **इराणी समर्थित 'कताईब हिजबुल्ला' (Kataib Hezbollah) या संघटनेने अमेरिकन तळांवर हल्ले करण्याची तयारी दर्शवली आहे.**
- **इराणमधील भारतीयांसाठी सतर्कतेचा इशारा: इराणमधील बिघडलेली परिस्थिती पाहता, तेथील भारतीय दूतावासाने भारतीय नागरिक आणि प्रवाशांसाठी 'अँडव्हायझरी' जारी केली आहे. भारतीयांना सुरक्षित स्थळी राहण्याचे आणि अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या भीषण युद्धामुळे मध्यपूर्वेतील परिस्थिती अधिकच हाताबाहेर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.**

तसेच ६०हून अधिक मुली जखमी झाल्या आहेत. इराणच्या सरकारी माध्यमांनी याला दुजोरा दिला असून, या घटनेमुळे जगभरात संतापाची लाट उसळली आहे. निष्पाप शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याने या संघर्षाला आता अधिक गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे.

इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनुसार, इस्त्रायल आणि अमेरिकेच्या संयुक्त एअर स्ट्राइक्समध्ये एका शाळेला लक्ष्य करण्यात आले. यामध्ये ४० शाळकरी मुली जागीच ठार झाल्या, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. शनिवारी सकाळी इराणची राजधानी तेहरानसह अनेक प्रमुख शहरांमध्ये एकामागून एक भीषण स्फोट झाले. या हल्ल्यांमुळे संपूर्ण इराणमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे. या मोहिमेला 'ऑपरेशन एपिक फ्युरी' (Operation Epic Fury) असे नाव देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणमधील अणुकेंद्र आणि लष्करी तळांना लक्ष्य केल्याचा दावा केला आहे. पण या भीषण हल्ल्यानंतर इराणनेही जशास तसे उत्तर देण्याची धमकी दिली आहे.

# AAIB च्या अहवालात मोठी चूक

## बारामतीचा जिल्हा म्हणून उल्लेख, रोहित पवारांचे तपासावर प्रश्नचिन्ह

**▸विदर्भ केसरी।**

अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या संदर्भात 'एएआयबी'ने (Aircraft Accident Investigation Bureau) प्रसिद्ध केलेला प्राथमिक अहवालात कोणता निष्कर्ष काढला? CID या अहवालाचा आधार घेऊन कसा तपास करणार आहे? असे प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केले आहे. तसेच या अहवालात बारामतीचा उल्लेख 'जिल्हा' म्हणून करण्यात आल्याने, केंद्र सरकारच्या या संस्थेने किती गांभीर्याने तपास केला हे दाखवण्यासाठी पुरेसे आहे, असा बोचरी टीका रोहित पवारांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे विचारला आहे.

२८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी हवाई उड्डाण मंत्रालयाच्या AAIB यंत्रणेने शनिवारी २२ पानांचा प्राथमिक अहवाल प्रसिद्ध केला आहे. ज्यामध्ये लँडिंगसाठी घाई करण्यात आल्याचे आणि बारामती विमानतळावर सोयीसुविधांचा अभाव असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या अहवालावर रोहित पवार यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत.

### अहवालातील चूक काय?

- **रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये अहवालातील पान क्रमांक ४ वरील मुद्दा ५.१ कडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. या मुद्द्यात "Baramati Airfield is situated in the Baramati District of the state Maharashtra" असे वाक्य लिहिण्यात आले आहे. वास्तविक पाहता बारामती हा पुणे जिल्ह्यातील एक तालुका आहे. एका राष्ट्रीय स्तरावरील तपास संस्थेने आपल्या अधिकृत अहवालात जिल्ह्याचे नाव चुकीचे लिहिणे, हे त्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचे म्हटले जात आहे.**

### नेमके काय म्हणाले रोहित पवार?

- **प्राथमिक अहवालात AAIB ने कोणता प्राथमिक निष्कर्ष काढला? असा सवाल रोहित पवार यांनी केला आहे. तसेच CID या अहवालाचा आधार घेऊन कसा तपास करणार आहे? अशी विचारणाही त्यांनी केली. या अहवालातील पान क्रमांक ४ वरील मुद्दा ५.१ मधील "Baramati Airfiled is situated in the Baramati District of the state Maharashtra" हे वाक्य AAIB ने हा अहवाल किती गांभीर्याने बनवला हे दाखवण्यासाठी पुरेसे आहे. परवा मुंबईत यावर विस्तृत बोलेल, असे रोहित पवार यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.**

### एएआयबीच्या अहवालात काय?

- **एएआयबीच्या अहवालानुसार, मुंबईहून बारामतीकडे येणाऱ्या या व्हीआयपी (VIP) फ्लाईटने रनवे ११ वर लँडिंगचा प्रयत्न केला होता. मात्र, पहिल्या प्रयत्नात वैमानिकाला लँडिंग करता आले नाही, त्यामुळे त्यांनी 'गो-अराउंड' (Go-Around) केला. दुसऱ्या प्रयत्नात पायलटने "Field in sight" असा संदेश दिला. परंतु, एअर ट्रॅफिक कंट्रोलने (ATC) त्यावेळी ३ किलोमीटर इतकी दृश्यमानता (Visibility) नोंदवली होती, जी 'व्हीएफआर' (व्हिज्युअल फ्लाईट रूल्स) नियमांनुसार आवश्यक असलेल्या ५ किलोमीटरपेक्षा खूपच कमी होती. लँडिंग क्लिअरन्स मिळाल्यानंतर काही क्षणांतच विमान रनवेच्या डावीकडे ५० मीटर अंतरावर असलेल्या झाडांवर आदळले आणि त्यानंतर लागलेल्या भीषण आगीत विमान जळून खाक झाले.**


# 'लाडकी बहीण' मुळे विकासकामांना ब्रेक

**▸विदर्भ केसरी। छत्रपती संभाजीनगर:**

"लाडकी बहीण योजना सुरू ठेवण्यासाठी सरकारने एक पाऊल मागे घेतले असून, यामुळे विकासकामांना काही प्रमाणात ब्रेक लागला आहे," अशी प्रांजळ कबुली शिवसेना प्रवक्ते आ. संजय शिरसाट यांनी शनिवारी येथे दिली. शहरातील विविध राजकीय आणि सामाजिक प्रश्नांवर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

अजित पवार यांच्या निधनाला एक महिना पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिरसाट म्हणाले की, "या अपघाताबाबत अनेकांनी अनेक अंदाज लावले आहेत. ब्लॅक बॉक्स जळाल्याचे सांगितले जात होते, मात्र तो सुरक्षित आहे. DGCA चा अहवाल आल्यावर घातपात की अपघात, हे स्पष्ट होईल. रोहित पवार यांनी जी माहिती काढली आहे, त्यावर सरकारने लक्ष दिले पाहिजे."

मुंबईच्या महापौर पदाबाबत उद्धव ठाकरेंनी केलेल्या विधानाचा समाचार घेताना शिरसाट म्हणाले, "उद्धव ठाकरे स्वप्नात आहेत. सरकार बदलणार म्हणता म्हणता पाच वर्षे निघून जातील. मुंबईचा महापौर आमचाच असेल. त्यांनी आता स्वतः कधी मुख्यमंत्री होणार, हेही सांगून टाकावे."



## मुंबई – पुणे एक्स्प्रेस वेवरील अपघाताची विधानसभेत चर्चा

**▸विदर्भ केसरी।**

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आजही अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली. यात विविध आमदारांनी तारांकित प्रश्न व लक्षवेधींच्या माध्यमातून आपापल्या मतदारसंघातील प्रश्नांकडे लक्ष वेधले. आज विधानसभेत नियम 293 अन्वये चर्चा झाली. त्यात अनेक आमदारांनी सहभाग घेतला. चालू महिन्याच्या सुरुवातीला मुंबई - पुणे एक्सप्रेसवर प्रोपेलिन वायूचा टँकर उलटल्याने संपूर्ण महामार्ग ठप्प झाला होता. यामुळे तब्बल 32 तास ट्रॅफिक जाम होऊन वाहनचालकांचे प्रचंड हाल झाले होते.

# फटाक्यांच्या फॅक्ट्रीत स्फोट १८ जणांचा मृत्यू

**▸विदर्भ केसरी।**

आंध्र प्रदेशच्या काकीनाडा जिल्ह्यातून एक अत्यंत हृदयद्रावक बातमी समोर येत आहे. काकीनाडा जिल्ह्यातील वेत्लापलेम गावात असलेल्या एका फटाक्याच्या कारखान्यात शनिवारी भीषण स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाल्याचे समजते. दरम्यान, मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती, आंध्र प्रदेशच्या गृहमंत्री वंगालापुडी अनीता यांनी या घटनेची माहिती देताना व्यक्त केली.



गृहमंत्री अनीता यांनी दिलेल्या माहितीनुसार, "आम्हाला मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार १८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर सहा जण गंभीररीत्या भाजले आहेत. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत." तसेच, जिल्हा दंडाधिकारी सगीली शान मोहन यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोटातील जखमींपैकी अनेकांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे समजते. अधिकृत माहितीनुसार, स्फोट झाला, तेव्हा कारखान्यात सुमारे २० जण काम करत होते.

- **मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्त केला शोक, दिले महत्वाचे नर्देश... -**

दरम्यान, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर पोस्ट करत ते म्हणाले, "वेत्लापलेम गावातील फटाका कारखान्यात झालेली ही दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आहे." त्यांनी तत्काळ जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून बचावकार्याचा आढावा घेतला आणि पीडितांना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठ अधिकारी आणि मंत्र्यांना घटनास्थळी भेट देण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, सरकार प्रभावित कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा विश्वासही त्यांनी दिला आहे.

# अखेर ती वाघिण जेरबंद

**▸विदर्भ केसरी। तळोधी (बा)**

ब्रह्मपुरी वनविभागाच्या तळोधी (बा.) वनपरिक्षेत्र कार्यालयांतर्गत येणाऱ्या बाळापूर-येनोली परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून दहशत माजवणाऱ्या वाघिणीला शनिवार, 28 फेब्रुवारी रोजी दुपारी 2 वाजताच्या सुमारास जेरबंद केले गेले.

सध्या शेतीतील रोवणीची कामे सुरू असल्याने शेतकरी शिवारात जाण्यास भीत होते. वाघिणीच्या उपस्थितीमुळे शेतीकामांवर परिणाम होत होता व नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेवून वनविभागाने तात्काळ विशेष पथके तैनात करून 24 तास गस्त वाढवली. वनरक्षक, कर्मचारी व मजूर यांच्या साहाय्याने परिसरात सातत्याने पाहणी, पायवाटांची तपासणी तसेच नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात येत होत्या. ग्रामस्थांना रात्री एकट्याने बाहेर न पडण्याचे, शेतात समूहाने जाण्याचे आणि जनावरे सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे आवाहन वनविभागातर्फे करण्यात येत होते.



वनपरिक्षेत्र अधिकारी अनुप कन्नमवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण मोहीम राबविण्यात आली. सहाय्यक वनसंरक्षक माने तसेच वर्ग कर्मचारी यांनी सक्रिय सहकार्य करत नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचला आणि वाघिणीच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले. अखेर शनिवारी दुपारी 2 वाजताच्या सुमारास टि-139 मादी वाघिण वय अंदाजे 20 महिने या वाघिणीस बेशुद्ध करून जेरबंद करण्यात आले. या वाघिणीची पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे यांच्याकडून वैद्यकीय तपासणी करण्यात आली. ही कारवाई ब्रम्हपुरीचे उपवनसंरक्षक एस. आर. कुमारस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक वनसंरक्षक (तेंदू) एम. बि. गायकवाड, सहायक वनसंरक्षक (वन्यजीव) अरविंद, वनपरिक्षेत्र अधिकार ए. आर. कन्नमवार, क्षेत्र सहाय्यक ए. जी. मने, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे, पोलिस हवालदार अजय मराठे व त्यांची चमू, आरआरटी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे बायोलॉजीस्ट राकेश आहुजा उपस्थित होते.

# 'देशात दोन विचारधारांची लढाई

## काँग्रेसची विचारधारा संविधानवादी तर भाजपाची...', हर्षवर्धन सपकाळ यांची टीका

**▸विदर्भ केसरी। मुंबई -**

देशात दोन विचारधारांची लढाई आहे, एक विचारधारा काँग्रेसची आहे तर दुसरी भाजपाची.काँग्रेस व भाजपाच्या स्वप्नातील भारत वेगळा आहे. संविधानाला अभिप्रेत भारत निर्माण करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे, तर हा देश फक्त मूठभर लोकांचा असावा, स्त्री-पुरुष समानता न मानणारा, स्पृश्य-अस्पृश्यता माननारा मनुवादी विचार भाजपाचा आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

चिपळूण येथे सुरु असलेल्या काँग्रेसच्या प्रशिक्षण शिबिरात दुसऱ्या दिवशी मार्गदर्शन करताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दोन विचारधारांमधील फरक स्पष्ट करुन सांगितला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ-भाजपाला सत्ता, संपत्ती हवी आहे, सर्व यंत्रणांवर कब्जा हवा आहे, हिंसा, द्वेष, भय पसरवणे, असत्य कथन करणे व देश हा मुठभर लोकांच्या हाती असावा, अशी त्यांची संकल्पना असून आज त्याच पद्धतीचे वातावरण भारतात आहे. निवडणूक आयोग, ईडी, सीबीआय, न्यायपालिका, सरकारी यंत्रणा अशा सर्व संस्थांवर भाजपाने कब्जा केला असून देशभर त्यांनी थैमान घातले आहे. भाजपा मनुस्मृती व 'बंच ऑफ थॉट'ला अभिप्रेत भारत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे पण याच्या उलट काँग्रेसची विचारधारा आहे. हा देश सर्वांचा आहे, देशातील संपत्तीवर सर्व लोकांचा अधिकार आहे, सत्तेचे विकेंद्रीकरण हा काँग्रेसचा विचार आहे. संविधानानुसार देश चालला पाहिजे ही काँग्रेसची भूमिका आहे आणि या संविधानात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याचे, शिव, शाहु, फुले, आंबेडकर, संत, वारकरी संप्रदाय, बसवेश्वर महाराज यांचे विचार आहेत.




हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात पंडित जवारलाल नेहरु यांनी सहा बिगर काँग्रेसी नेत्यांना स्थान दिले होते. यामागे सर्व विचारधारांना सहभागी करुन घेणे हा विचार होता. पंतप्रधान पंडित नेहरुंची कॉलर एका सामान्य महिलेनी पकडून 'स्वातंत्र्याने मला काय दिले'? अशी विचारणा केली, त्यावेळी नेहरुंनी त्या महिलेला अटक केली नाही उलट तिच्या प्रश्नाला शांतपणे उत्तर दिले. आजच्या भारतात अशी हिम्मत कोणी करु शकत नाही. युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले तर त्यांना अटक करुन देशद्रोही असल्याचा अपप्रचार केला जात आहे. आज सरकारच्या विरोधात कोणी बोलू शकत नाही, अशी भयानक परिस्थिती देशात आहे. काँग्रेसला संपवण्याचे अनेक प्रयत्न झाले पण काँग्रेस संपणार नाही. काँग्रेस पक्षाला मोठा वारसा लाभलेला आहे. ज्यांनी काँग्रेसमुक्त भारताचे स्वप्न पाहिले तेच काँग्रेसयुक्त झाले आहेत. आपले नेते राहुल गांधी यांनी आपल्याला 'डरो मत'चा संदेश दिला आहे. कोणत्याही दबावाला, दहशतीला न घाबरता विचारांची लढाई लढा आणि जो लढेल तोच जिंकेल, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# गावठी दारू अड्ड्यावर छापा

**▸विदर्भ केसरी। पुणे**

नगर रस्त्यावरील भावडी गावात गावठी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर गुन्हे शाखेने छापा टाकला. या कारवाईत एका महिलेला अटक करण्यात आली असून, पोलिसांनी ६ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव अनिशा योगेश गुडदावत (वय २०, रा. भावडी, ता. हवेली, नगर रस्ता) असे आहे. नगर रस्त्यावरील भावडी गावातील मोकळ्या जागेत एक महिला गावठी दारू तयार करून विकत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या युनिट सातला मिळाली होती. पोलीस कर्मचारी नितीन धाडगे आणि प्रतिक्षा पानसरे यांना ही माहिती मिळाली होती.

माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी गावठी दारू तयार करण्याच्या भट्टीवर छापा टाकला. या छाप्यात १८ लिटर तुरटी मिश्रित पाणी, गावठी दारू बनवण्यासाठी लागणारे रसायन आणि इतर साहित्य असा एकूण ६ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अनिशा गुडदावत हिच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आली आहे. सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, सारंग दळे, गिरीष नाणेकर, निलेश साळवे, सुहास तांबेकर, प्रशांत कापुरे, निर्णय लांडे, नेहा तापकीर, सोनाली नरवडे, ऋषीकेश ताकवणे आणि बाळासाहेब तनपुरे यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वी केली.

दैंनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू

रविवार, १ मार्च २०२६ | २

## अग्रलेख

# सुनियोजित कट!

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकावर सुप्रीम कोर्टाने सरसकट बंदी घातली असून हे कृत्य म्हणजे सुनियोजित कट असल्याचे सांगत केंद्र सरकारला गुरुवारी चांगलेच फटकारले. तसेच केंद्र आणि राज्य सरकारला पुस्तकाच्या सर्व प्रती परत घेण्याचे आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरूनही प्रती काढून टाकत दोन आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. बागची आणि न्या. पांचोली यांच्या खंडपीठाने सरकारची गुरुवारी चांगलीच खरडपट्टी काढली. शिक्षणाची अखंडता राखण्यासाठी या प्रकरणामध्ये तातडीने हस्तक्षेप आवश्यक आहे, असे खंडपीठाने म्हटले आहे. ज्या वयामध्ये विद्यार्थ्यांना सार्वजनिक जीवन आणि संस्थात्मक संरचनांचे बारकावे समजू शकतात त्या वयामध्ये एकतर्फी वक्तव्ये समोर आल्यास मूलभूत गैरसमज निर्माण होतात आणि त्यामुळे न्यायपालिकेची जबाबदारी समजण्यापासून रोखले जाते, असे सरन्यायाधीश म्हणाले आणि त्यांनी हे प्रकरण बंद करणार नसल्याचे संकेतही दिले. 'त्यांनी गोळी झाडली असून न्यायव्यवस्था रक्तबंबाळ झाली आहे, चुकीला माफी नाही, दोषींची नावे सांगा, आम्ही कारवाई करतो', असेही यावेळी सुप्रीम कोर्टाने सरकारला बजावले. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ११ मार्च रोजी होणार आहे. या प्रकरणी बिनशर्त माफी मागण्यात आली असली तरी ती स्वीकारता येणार नाही. हे पुस्तक कसे प्रकाशित झाले याची चौकशी केली जाईल, आम्ही या संस्थेला कलंकित होऊ देऊ शकत नाही, हे एक षडयंत्र असू शकते. संपूर्ण न्यायव्यवस्थेला अशा प्रकारे लक्ष्य करणे चुकीचे आहे, असेही सरन्यायाधीश म्हणाले. 'एनसीईआरटी'ने हे वादग्रस्त प्रकरण काढून टाकले असले तरी या पुस्तकाच्या ३८ प्रती त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरत आहेत. विकल्या गेलेल्या ३८ प्रती परत मिळवण्याचा शिक्षण मंत्रालयाकडून प्रयत्न केला जात आहे. 'विचार न करता उचललेले पाऊल' असे संबोधून सरन्यायाधीश म्हणाले की, एनसीईआरटीच्या प्रसिद्धिपत्रकामध्ये माफीचा एकही शब्द नाही. हा एक रचलेला सुनियोजित कट आहे. हे पुस्तक बाजारात उपलब्ध आहे आणि माझ्याकडे त्याची एक प्रत आहे. प्रथमदर्शनी, पुस्तकातील मजकुराची तपासणी केल्यावर आम्हाला असे दिसते की, हे संस्थेला कमकुवत करण्यासाठी आणि न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा कमी करण्यासाठी जाणूनबुजून केलेले डावपेच आहेत, असे सरन्यायाधीश म्हणाले. न्यायपालिकेला एक संस्था म्हणून बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जनतेच्या आणि लहान मुलांच्या मनात न्यायपालिकेची नकारात्मक प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. माजी सरन्यायाधीशांनी बोललेले काही शब्द जाणूनबुजून निवडले गेले होते. त्यातून असे चित्रित करण्याचा प्रयत्न करण्यात आला की, न्यायपालिकेविरुद्ध अनेक भ्रष्टाचाराचे खटले दाखल केले जातात, जे कधीही ऐकले जात नाहीत. हे बदनाम करण्याचे षडयंत्र आहे. लेख प्रकाशित करणा-या वृत्तपत्राने एनसीईआरटीला प्रश्न विचारला तेव्हा, मजकूर प्रेरित आणि सदोष असल्याचे मान्य करण्याऐवजी, संचालकांनी मजकुराचा बचाव केला. मजकुरात भ्रष्टाचार निर्मूलनासाठी न्यायपालिकेच्या प्रयत्नांची चर्चा करण्यात आली नाही. या मजकुराचा मुलांच्या मनावर होणा-या नकारात्मक परिणामाव्यतिरिक्त, हे पुस्तक संपूर्ण समाजावर देखील परिणाम करते, कारण ते केवळ सध्याच्या पिढ्याच नव्हे तर भविष्यातील पिढ्यादेखील वाचतील. सुप्रीम कोर्टाने म्हटले की, हे फौजदारी अवमानाचे प्रकरण आहे, कारण तो न्यायाच्या मार्गात अडथळा आणण्याचा प्रयत्न आहे. म्हणून शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण विभागाचे सचिव आणि एनसीईआरटीच्या संचालकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी. केंद्रीय आणि राज्य शिक्षण विभागांनी हे पुस्तक, छापील असो वा डिजिटल, सार्वजनिक प्रवेशापासून तत्काळ काढून टाकावे आणि याची खात्री करावी. पुस्तकाची छापील किंवा डिजिटल आवृत्ती वाटणे हे न्यायालयाच्या आदेशाचे जाणूनबुजून उल्लंघन मानले जाईल. सर्व राज्यांच्या शिक्षण विभागांच्या मुख्य सचिवांनी या प्रकरणात केलेल्या कारवाईचा अहवाल दोन आठवड्यांच्या आत सर्वोच्च न्यायालयात सादर करावा आणि तपास अहवाल प्राप्त झाल्यानंतर, न्यायालय संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी आणि जबाबदार असलेल्यांची ओळख पटविण्यासाठी एक समिती स्थापन करेल. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संबंधित पुस्तक बाजारातून मागे घेण्याची घोषणा करत खेद व्यक्त केला आहे. धर्मेंद्र प्रधान म्हणाले की, आम्ही न्यायव्यवस्थेचा संपूर्ण सन्मान करतो. न्यायव्यवस्थेने जे काही सांगितले त्याचे आम्ही संपूर्ण पालन करू. जे काही झाले त्यामुळे आम्ही दुःखी आहोत, आम्ही दिलगिरी व्यक्त करतो. याप्रकरणी दोषनिश्चिती केली जाईल आणि संबंधितांवर कारवाई केली जाईल. इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकातील वादग्रस्त मजकुरामुळे देशाच्या राजकीय आणि न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या पुस्तकात न्यायपालिकेतील भ्रष्टाचाराचा संदर्भ देण्यात आला असून त्यावर पंतप्रधान मोदी यांनी मंत्रिमंडळ बैठकीत तीव्र नापसंती व्यक्त केली. केंद्र सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी बिनशर्त माफी मागितली असून, हा वादग्रस्त धडा तयार करणा-या व्यक्तींना यापुढे मंत्रालयाशी संबंधित कोणत्याही कामात सामावून घेतले जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. एनसीईआरटीनेही या 'अयोग्य मजकुरा'बद्दल माफी मागितली आहे.

# '........मन झाले ओलेचिंब'!

न.मा.जोशी ८८०५८४८९५१



(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक, राज्य मागास आयोगाचे माजी सदस्य आणि 'दर्पण' पुरस्कार प्राप्त पत्रकार आहेत)

**'सत्यसाई दिव्यानुभव' आणि 'ईब्तिदा- ए- मुंगसाजी....' हे माझे लेख प्रसिद्ध झाल्यावर नेहमी प्रमाणे अनुकुल -प्रतिकुल प्रतिक्रियांचा पाऊसच पडला. मी आधीच स्पष्ट करतो की मला "तुम्ही जे म्हणता ते मला मान्य नाही, पण ते बोलण्याच्या तुमच्या अधिकाराचे मी मरेपर्यंत रक्षण करेन," हे तत्त्ववेता वॉल्टेअरचे अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दलचे मत मान्य आहे.त्यामुळे प्रतिकुल प्रतिक्रियांचेही स्वागत.**



अनेक महानुभावांनी व्यक्त केलेल्या अत्यंत उद्बोधक अशा प्रतिक्रियांनी मला कमालीचे हर्षित केले आहे. ईश्वरावरील श्रद्धा दृढ होण्यास त्या प्रतीक्रिया खूप मदत करीत असतात. ईश्वराला समजून घेणे हे मानवी शक्तीच्या पलीकडे आहे.

विज्ञान किंवा बुद्धिवाद स्पष्टीकरण करू शकणार नाहीत अशा जीवनातील काही घटनांचे अनुभव अल्बर्ट आईन्स्टाईन, एपीजे अब्दुल कलाम, होमी भाभा, नानी पालखीवाला यासारख्या विज्ञाननिष्ठ महामानवांकडून ऐकल्यावर ,ईश्वर आहे की नाही याबद्दलचा संशय नाहीसा होतो.या विश्वात एक अदृश्य शक्ती काम करते हे मान्य करावे लागेल.

स्वप्न आणि वास्तव यांचा काहीही संबंध नाही असा माझा ठाम विश्वास आहे. मात्र परमेश्वरी अवताराच्या रूपात ज्या संत महात्म्यांचे दर्शन स्वप्नात घडते ती स्वप्ने साकार होतात किंवा त्यांचा वास्तवाशी काहीतरी संबंध असतो याची मात्र खात्री झाली आहे,असा उल्लेख माझ्या लेखात होता. आश्चर्य असे की काही दिवसांनी मला अत्यानंद देणारे आणखी एक स्वप्न सकाळी सहा वाजता पडले होते. ज्यात गणेशाच्या विविध आकाराच्या सात आठ मुर्त्यांच्या समोर एक गृहस्थ पूजा आरती करीत आहेत आणि बाजूला जलाराम बाप्पा उभे आहेत. गणपतीच्या या सात आठ मुर्त्या म्हणजे महाराष्ट्रातील श्री मोरेश्वर( मोरगाव, पुणे): श्री सिद्धिविनायक(सिद्धटेक, अहमदनगर) श्री बल्लाळेश्वर(पाली, रायगड): श्री वरदविनायक(महाड, रायगड): चिंतामणी □श्री गिरिजात्मजश्री विघ्नेश्वर (ओझर, पुणे):महागणपती (रांजणगाव, पुणे):या अष्टविनायक असाव्यात किंवा विदर्भातील नागपूरचा टेकडी गणपती, आदासाचा शमी विघ्नेश, रामटेकचा अष्टदशभुज, मेंढाचा भृशुंड, पवनीचा सर्वतोभद्र, केळझरचा सिद्धिविनायक, कळंबचा चिंतामणी आणि भद्रावतीचा वरदविनायक हे जागृत स्वयंभू अष्टविनायक असावेत. स्वप्न भंग होऊन जागृतावस्था प्राप्त झाल्यावर प्रातःर्विधी, मुखमार्जन चहादी आन्हीकेआटोपून नेहमी प्रमाणे भ्रमणध्वनी हाती घेतला आणि अहो आश्चर्यम! स्क्रीन टच होताच एका संतांचे गणेश या विषयावरील प्रवचन सुरू होते. ते गणेश वर्णन नंतर मी यू ट्यूब वर ऐकले.हा ही एक दिव्यानुभव. स्वप्न आणि वास्तव या संबंधीच्या ईब्तिदा- ए- .....!' या माझ्या लेखावर प्रतिक्रियांचा पाऊसच पडलाअसला तरी मात्र त्यात चार प्रतिक्रिया खूपच उद्बोधक असल्याने त्याचा उल्लेख आवश्यक आहे. रामटेक येथील कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठातील संस्कृत विषयाच्या ख्यातनाम प्रोफेसर, अधिष्ठाता आणि विभाग प्रमुख डॉ.कलापिनी हरेकृष्ण अगस्ती (राणे), अविवाहित राहून सारे जीवन ज्ञानेश्वरी साठी समर्पित करणा-या लोणी (यवतमाळ)च्या अपर्णा (द.तु.नंदापुरे यांची कन्या) आणि अमरावतीच्या पूर्वाश्रमीचे किंग एडवर्ड कॉलेज (विदर्भ महविद्यालय) आणि आता शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय संस्थचे निवृत्त प्राचार्य प.सि.काणे या तीन विद्वानांनी दिलेल्या अत्यंत समर्पक आणि उद्बोधक प्रतिक्रिया फारच महत्त्वाच्या आहेत.प्रा. डॉ . कलापिनी अगस्ती (राणे)यांनी लिहिले आहे की, पातंजल योगसूत्रातील समाधी पादांमध्ये चित्तप्रसादनाच्या उपायांमध्ये पतंजलींनी 'स्वप्ननिद्राज्ञानालंबनम् वा' | हे सूत्र दिले आहे. याचा अर्थ स्वप्न आणि निद्रेतील प्राप्त ज्ञानाच्या/ दृष्टांताच्या अनुभवाला आलंबन करून तिथे चित्त एकाग्र केल्यास आपले चित्त प्रसन्न राहते व प्रसन्नचित्त समाधीस्थ होते. स्वप्न ही अशी अवस्था आहे जेव्हा एखादी व्यक्ती झोपलेली असते. झोपेत असताना, त्याच्या मनात काही विचार किंवा संस्कार चालू असतात. त्या विचार किंवा संस्काराची जाणीव होणे याला स्वप्न म्हणतात.

स्वप्न कधी चांगले तर कधी वाईट असू शकतात. चांगली स्वप्ने पाहिल्याने आपले मन एकाग्र आणि आनंदी होते, तर वाईट स्वप्ने आपले मन अशांत आणि दुःखी करते.

म्हणून, जेव्हा आपल्याला चांगले स्वप्न पडते तेव्हा आपण स्वप्नात अनुभवलेली चांगली भावना तशीच राहावी अशी आपली इच्छा असते.

जेव्हा योगी अशा सकारात्मक स्वप्नात आश्रय घेतो तेव्हा ते त्यांना एकाग्र होण्यास आणि आनंदी होण्यास मदत करते.

दुसरे म्हणजे, झोप ही अशी अवस्था आहे जेव्हा आपल्या सर्व इंद्रिये विश्रांती घेतात आणि आपले शरीर पूर्णपणे आरामशीर असते. ज्यामध्ये स्वप्ने किंवा दृष्टान्त कधीच येत नाहीत. याला गाढ झोप म्हणतात. प्रज्ञाचक्षू श्री गुलाबराव मह'राजांनी 'हिरण्ययोग' पुस्तकात स्वप्नाचे अन्यार्थक, अपार्थक आणि यथार्थक असे विभाजन केलेले आहे. सात्विक निद्रेत / स्वप्नात पाहिलेले संत महात्म्यांचे दर्शन हे यथार्थक स्वप्नामध्ये अंतर्भूत होते. ज्याप्रमाणे रामरक्षा लिहिणाऱ्या बुधकौशिक ऋषींना, शिवसूत्र लिहिणाऱ्या वसुगुप्तांना स्वप्नात झालेला दृष्टांत प्रत्यक्ष ,यथार्थ रूपामध्ये साकार झालेला दिसला असे शास्त्रप्रमाण आहे. अपर्णा नंदापुरे यांनी कळविले की

"संतांची कृपा खरंच अतर्क्य असते...आपण निवडले गेलेलो असू" याचा छान संदर्भ उपनिषदांत-(मुण्डकोपनिषद् ३.२.३) आहे...

नायं आत्मा प्रवचनेन लभ्यः । न मेधया न बहुना श्रुतेन । यमेवैष वृणुते तेन लभ्यस् । तस्यैष आत्मा विवृणुते तनु स्वाम् ।। आत्मस्वरूप हे प्रवचन, भाषण किंवा वक्तृत्वाने प्राप्त होत नाही.केवळ मनाच्या तीक्ष्णतेने किंवा स्मरणशक्तीने किंवा शास्त्रांचे जास्त श्रवण किंवा वाचन करून नाही. आत्मा स्वतः हे निवडतो (म्हणजेच, आत्मसाक्षात्कार प्राप्त केलेला साधक) आणि त्या साधकाला, आत्मा स्वतःच त्याचे खरे स्वरूप प्रकट करतो. आदि शंकराचार्य स्पष्ट करतात की आत्म्याला प्रवचन, बुद्धी किंवा शास्त्रांच्या बाह्य अभ्यासाने प्राप्त करता येत नाही, जोपर्यंत या प्रयत्नांना आत्म-विवेक, श्रद्धा आणि मनाची शुद्धता मिळत नाही. प्रत्यक्षात, आत्मा बाह्यतः कोणालाही निवडत नाही; उलट, जेव्हा साधकाचे मन पूर्णपणे शुद्ध, इच्छामुक्त आणि एकाग्र होते, तेव्हा तो आत्म्याच्या प्रकाशाला, ब्रह्माच्या अवताराला, आत्म्याच्या कृपेने पाहतो. " आत्मा त्याचे खरे निराकार स्वरूप प्रकट करतो, कोणतेही दृश्यमान शरीर नाही. हा मंत्र श्रोत्यांना पुन्हा सांगतो की आत्म-साक्षात्कार म्हणजे केवळ माहिती गोळा करणे नाही. ती एक अनुभवात्मक जागृती आहे . तिसरी प्रतिक्रिया ज्ञानमहर्षी प्राचार्य प.सि.काणे यांची.प्राचार्य काणे सरांनी आल्बर्ट आईनस्टाईन चे 'आपल्या भोवती अनेक गुढ शक्ती नांदत आहेत,हाच सर्वात सुंदर अनुभव होय आणि या मूलभूत जाणिवेतूनच खरी कला खरे शास्त्र विकास पावत असते' हे विधान सांगितले.प्राचार्य काणे म्हणाले की,

रामदास स्वामींनी चिंतन करताना या देशाचे एक स्वप्न पाहिले. त्यात म्लेंच्छ राजवटीचा शेवट होऊन हिंदुस्थान बलशाली झाल्याचे पाहिले. त्यात स्वामी म्हणतात, 'बुडाले भेदवाही ते। नए चांडाळ पातकी। गळाले, पठाले, मेले, जाले देशधडी पुढे।' हे आनंदवनभुवनी प्रकरण लिहीत असताना

दुष्ट, पापी, कपटी, कारस्थानी विश्वासघातकी, नीतिन्यायाची चाड नसलेला औरंगजेब समर्थांसमोर होता. त्याने हिंदवी स्वराज्य, हिंदू संस्कृती, हिंदू धर्म नष्ट करण्याचा चंग बांधला होता. त्यामुळे सात्त्विक संतापाने औरंगजेबाचा उल्लेख ते 'औरंग्या'अशा तुच्छतादर्शक शब्दात करतात.

बुडाला औरंग्या पापी।
म्लेंच्छ संहार जाहला....
आनंदवनभुवनी!

संत प्रवृत्तीच्या रामदासांनी स्वप्नात

'औरंग्या पापी'चा मृत्यू पाहिला होता. आदि शंकराचार्य यांच्या मते, आत्म्याला प्राप्त करण्यासाठी : - १. विवेक २. वैराग्य 3.मन आणि इंद्रियांवर नियंत्रण आणि ४. मुमुक्षुत्व (मोक्ष प्राप्तीची तीव्र इच्छा)ही चार साधनेआवश्यक आहेत. ती नसतील तर मेधा, प्रवचन आणि शास्त्रांचे पठण हे देखील केवळ बौद्धिक ओझे बनतात. महानुभावांनी व्यक्त केलेल्या अत्यंत उद्बोधक अशा प्रतिक्रियांनी मला कमालीचे हर्षित केले आहे. खरेच आहे.... आनंदे मन जाहले ओलेचिंब दिसता स्वप्नी संत- प्रभू प्रतिबिंब!



# रस्ता दुरुस्तीचे काम निकृष्ट होत असल्याने नागरिक रस्त्यावर!

## वाडेगाव तामसी पिंपळगाव रस्त्यावरील प्रकार!

**विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**

बाळापूर : तालुक्यातील वाडेगाव तामसी पिंपळगाव रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू झाले मात्र सुरू असलेले काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने नागरिक रस्त्यावर येऊन तासभर काम थांबविले . उपरोक्त रस्त्याचे काम झाल्यावर अल्पावधीतच रस्ताची दुरवस्था झाल्याचे चित्र निर्माण झाले होते. त्यामुळे तामसी येथील उपसरपंच तसेच नागरिकांनी संमधीताकडे तक्रार सादर करून रस्ता दुरुस्तीची मागणी नुकतीच करण्यात आली होती. तर वाडेगाव तामसी पिंपळगाव अंदाजे पाच किलोमीटर अंतर असलेल्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम दोन दिवसांपासून. सुरू झाले मात्र होत असलेले काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास येत असल्याने तामसी पिंपळगाव येथील नागरिकांनी रस्त्यावर येऊन सुरू असलेले काम थांबविले. दरम्यान संमधीत ठेकेदार मुळे व डेप्युटी इंजीनियर एस. एन. बोचे उपस्थित झाले त्यावेळी उपस्थित नागरिकांनी सुरू असलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामा संदर्भात मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त केला. तसेच निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचे निदर्शनास आणून दिले.

जवळपास एक तासभर झालेल्या चर्चेअंती रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. त्यावेळी पिंपळगाव चे सरपंच प्रथमेश महानकार .रुषीकेश वानखेडे.पवन गावंडे. तसेच तामसी येथील भगवान पातोंड . सुनील मोरे. विद्याबाई पातोडे . रामदास बोरसे. पदमा पातोडे . विक्की गिते. प्रतिभा काळे. विजय पातोडे सह तामसी पिंपळगाव येथील नागरिक तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

# निर्मिती पब्लिक स्कूल येथे विज्ञान दिन उत्साहात साजरा

## तालुका प्रथम अ+दर्जा प्राप्त मान्यता शाळेत अंतरावर पार्त्याशिक सादरीकरण

**विदर्भ केसरी। सुयोग गोरले**



चांदूर बाजार : निर्मिती पब्लिक स्कूल येथे राष्ट्रीय विज्ञान दिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विज्ञानाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी आणि त्यांना आधुनिक ज्ञानाची दिशा मिळावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक तुषार खोंड सर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून चांदूर बाजार येथील PSI सिद्धेश्वर उमाडे साहेब, नंदकिशोर गव्हाळे सर, सुमित सर, रोशन राजस ,उपप्राचार्य अजीम सौदागर सर, शिवानी मॅडम तसेच इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली. मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विज्ञान विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. विविध वैज्ञानिक प्रयोगांचे सुंदर आणि प्रभावी प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे मन जिंकले. प्रयोगांमधून विज्ञानातील संकल्पना सोप्या आणि रोचक पद्धतीने समजावून सांगण्यात आल्या. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे शाळेत आयोजित करण्यात आलेला सायन्स डोम शो होय. या विशेष शोमध्ये सौरमाला, ग्रह, तारे आणि अवकाशाविषयी अत्यंत आकर्षक व माहितीपूर्ण सादरीकरण करण्यात आले. गोलाकार पडद्यावर दाखविण्यात आलेल्या त्रिमितीय दृश्यांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अवकाशात असल्याचा अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांनी हा शो मोठ्या उत्साहात पाहिला आणि विज्ञानाविषयी नवीन ज्ञान आत्मसात केले. विशेष म्हणजे, शाळेला महाराष्ट्र शासनाच्या स्काप'अ+' दर्जाचा सन्मान प्राप्त झाला आहे. या गौरवशाली यशाच्या पार्श्वभूमीवरच विज्ञान दिनाचा कार्यक्रम अधिक भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला होता. शैक्षणिक गुणवत्ता, उपक्रमशीलता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांची ही दखल मानली जात आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि मनोरंजक ठरला. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विज्ञानाची आवड जोपासत भविष्याच्या उज्ज्वल वाटचालीसाठी प्रेरणा देणारा हा कार्यक्रम सर्वांच्या स्मरणात राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# टोम्पे महाविद्यालयात महात्मा फुले स्मृती व्याख्यानमाला

## महात्मा फुले पुरोगामी महाराष्ट्राचे खरे दीपस्तंभ.... सुप्रसिद्ध वक्ते डॉ. किशोर फुले यांचे प्रतिपादन

**विदर्भ केसरी। चांदूरबाजार**



येथील गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संत नामदेव महाराज सांस्कृतिक सभागृहात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती समाजशास्त्र विभाग आणि गो. सी. टोम्पे महाविद्यालय समाजशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले स्मृति व्याख्यानमालेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध वक्ते डॉ. किशोर फुले अमरावती, संस्थेचे अध्यक्ष भास्करदादा टोम्पे, सचिव डॉ. विजय टोम्पे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके, डॉ. के. बी. नायक, उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर गव्हाळे, डॉ. श्याम येवतीकर, डॉ. सुमित इंगळे प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले, संत गाडगे महाराज, स्वर्गीय गोविंदरावदादा टोम्पे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून डॉ. नंदकिशोर गव्हाळे यांनी कार्यक्रम आयोजनामागची भूमिका व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा सविस्तर मांडला तर प्रमुख मार्गदर्शक डॉ. किशोर फुले समाजसुधारकांचा दीपस्तंभ या विषयावर आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले महात्मा फुले हे एक कर्ते सुधारक होते. महात्मा फुलेंनी 1948 मध्ये मुलींसाठी पहिली शाळा काढून पिढ्यानपिढ्या चूल आणि मूल अशा प्रकारे चार भिंतीत आपलं संपूर्ण आयुष्य व्यतीत करणाऱ्या सबंध स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. समाजातील तत्कालीन अनिष्ट प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, समाजातील उच्चनीच्छता, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक भेदभाव याला कडाडून विरोध केला. विशेषतः स्त्रियांसाठी विधवा पुनर्विवाह, दलित स्त्रियांसाठी सार्वजनिक पानवटे खुली, बालहत्या प्रतिबंधकगृह, विधवा स्त्रियांचे केशवपन, सतीप्रथा अशा अनेक अतिशय वाईट कुप्रथा समाजातून नाहीशा करण्याचे सामाजिक कार्य केले. याबरोबरच गुलामगिरी, ब्राह्मणाचे कसब, तृतीयरत्न नाटक, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, शेतकऱ्याचा आसूड अशा सामाजिक पण तत्कालीन ज्वलंत विषयावर पुस्तके लिहून प्रबोधनाचे फार मोठे कार्य केले. पिढ्यानपिढ्या पशु सारखे जीवन जगणाऱ्या समाजाला स्वाभिमानाचे जीवन जगण्याचे धडे दिले. म्हणून महात्मा फुले हे पुरोगामी महाराष्ट्राचे खऱ्या अर्थाने दीपस्तंभ ठरतात असे म्हणाले.

याप्रसंगी भास्करदादा टोम्पे, डॉ. के. बी. नायक यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी आपल्या अध्यक्षीय भाषणातून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी महात्मा फुले यांचे जीवनकार्य सामाजिक दृष्ट्या अतिशय प्रेरणादायी असून ते प्रत्येकाच्या घराघरात पोहोचणे महत्त्वाचे आहे असे म्हणून स्वर्गीय गोविंदरावदादा टोम्पे यांनी स्थापन केलेल्या या महाविद्यालयाचे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रात असलेले योगदान अतिशय मौल्यवान असल्याचे सांगितले. तसेच यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. किशोर फुले यांचे संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शशिकांत दुपारे यांनी केले तर आभार डॉ. श्याम येवतीकर यांनी मानले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
रविवार, १ मार्च २०२६ | ३

GOOD MORNING
# कॉटनसिटी
!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## वणीत घरफोडीचा प्रयत्न उघडकीस

■ यवतमाळ : घराच्या दरवाजाच्या कुलूप कोंडा तोडून चोरी करण्याचा प्रयत्न फसला. ही घटना वणी येथील जलाव रोड परिसरातील वार्ड क्र. १३ मध्ये उघडकीस आली. विवेक पांडुरंग ताटेवार (५३) रा. येगीराज नगर वणी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, जनरलसिंग उर्फ मन्नुसिंग रामसिंग टाक (४५) आणि दीपक गणपत येरेकर (३६) दोघेही रा. दुर्गापूर जि. चंद्रपूर हे ताटेवार यांच्या घरात घुसले. त्यांनी दरवाजा तोडून घरात चोरीचा प्रयत्न केला, असे फिर्यादीत म्हटले आहे. त्यावरुन वणी पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

**महत्त्वाचे**

### पत्रकार युसूफ शेख यांना मातृशोक

**विदर्भ केसरी। संग्रामपूर -**



शहरातील रहिवाशी व पत्रकार युसूफ शेख यांच्या मातोश्री शरीफाबी हाजी अब्दुल रऊफ (वय ७०) यांचे दीर्घ आजाराने गुरुवारी, २६ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता पवित्र रमजान महिन्यात निधन झाले. त्या काही काळापासून आजारी होत्या. शुक्रवारी सकाळी १० वाजता शहरातील मरकज मस्जिद येथे जनाजाची नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर स्थानिक कब्रस्तानात दफनविधी पार पडला. दफनविधीप्रसंगी विविध धर्मीय समाजबांधव उपस्थित होते. त्यांच्या पश्चात मुले, मुली, नातवंडे असा मोठा परिवार असून त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.



### आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम सुरू

**विदर्भ केसरी। यवतमाळ -**

शालेय शिक्षण विभाग व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या वतीने यवतमाळ जिल्ह्यातील १६ तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याचा उद्देश मुलींना अधिकाधिक अद्यावत व परिपूर्ण प्रशिक्षण मिळावे यासाठी विशेष मार्गदर्शन व सराव सत्राचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच या प्रशिक्षणाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून मुलींना योगाचे प्रशिक्षण दिले जात आहे योगामुळे मुलींना उत्साह शारीरिक तंदुरुस्ती तसेच मनोबल वाढल्याचे दिसून येत आहे या उपक्रमाची संकल्पना शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मार्गदर्शनातून साकार होत असून राष्ट्र प्रथम या ध्येयातून मुलींना सक्षम करण्यावर भर देण्यात येत आहे. आत्मरक्षणा सोबतच आत्मविश्वास वाढण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचा विश्वास शिक्षण विभाग कडून व्यक्त करण्यात आला आहे.

### दोघांना रंगेहाथ पकडले

यवतमाळ : जिल्ह्यात शेतशिवारात घुसून मोटारपंप चोरी करण्याचे प्रकार वाढले आहेत. अशातच २६ फेब्रुवारीला डोर्ली शिवारातील शेतात दोघे जण अचानक शिरले. ते मोटारपंप चोरीसाठीच आले असावे असे समजून शेतकरी प्रितम भास्कर नागरगोजे यांनी त्यांना रंगेहात पकडले. शेतकऱ्याने त्यांची चौकशी सुरु करताच त्यातील एक जण पळून गेला. तर प्रकाश वसंतराव इंदूरकर (२०) रा. खानगाव हा शेतकऱ्याच्या तावडीत सापडला. मात्र त्याने शेतकऱ्याच्या कपाळावर, नाकावर दगड मारुन जखमी केले. यावेळी आरडाओरड ऐकून आजूबाजूच्या शेतातील लोक घटनास्थळी आले असता इंदूरकर याने 'मी पाणी पिण्यासाठी आलो होतो' असे सांगून बचाव करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी जखमी शेतकरी प्रितम भास्कर नागरगोजे (३२) रा. डोर्ली ता. यवतमाळ यांनी यवतमाळ शहर पोलिसात तक्रार दाखल केल्यानंतर प्रकाश इंदूरकर व अन्य एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चालू पिककर्ज माफ होणार का?

## पीकविमा कधी मिळणार? : कोरडवाहू अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती गंभीर

**विदर्भ केसरी। कळंब तालुका प्रतिनिधी:-विरेंद्र चव्हाण**



कळंब :-यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे झरी तालुक्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकरी अक्षरशः उद्ध्वस्त झाला आहे. सोयाबीन पावसाच्या पाण्यात वाहून गेले, तर कापसाचे उत्पादन एकरी एक-दोन क्विंटलही झाले नाही. "जगावं कसं?" हा जिव्हाळ्याचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. नैसर्गिक आपत्ती, बियाणे, खत, कीटकनाशके, तणनाशके आणि मजुरीचे वाढते दर यामुळे शेतीचा खर्च प्रचंड वाढला आहे. मात्र शेतमालाला योग्य बाजारभाव मिळत नसल्याने हातात काहीच शिल्लक राहत नाही. उलट कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे.पुढील हंगामासाठी लागणारे भांडवल, मुलांचे शिक्षण, दवाखान्याचा खर्च,मुला-मुलींचे लग्न या सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्यात तरी कशा,असा प्रश्न शेतकरी कुटुंबांना पडला आहे.आर्थिक ताणासोबत मानसिक खच्चीकरणही वाढत आहे. अतिवृष्टी अनुदानाची रक्कम अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेली नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकऱ्यांनी खरीप हंगामात पीकविमा काढला होता. मात्र शंभर टक्के नुकसान होऊनही पीकविम्याची रक्कम खात्यात जमा न झाल्याने संताप व्यक्त होत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे. दरम्यान, संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली नागपूर येथे भव्य आंदोलन पार पडले होते. राज्यभरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. त्यावेळी सातबारा कोरा करून संपूर्ण कर्जमाफी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र सध्या फक्त थकीत कर्जदारांचे कर्ज माफ करून चालू कर्जदारांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याचा विचार सुरू असल्याची चर्चा आहे. त्यामुळे चालू कर्जदार शेतकऱ्यांमध्ये संभ्रम व अस्वस्थता निर्माण झाली आहे. प्रत्यक्ष परिस्थिती पाहता चालू कर्जदारांचीही कर्जफेड करण्याची क्षमता संपुष्टात आली आहे. दिवसेंदिवस शेती व्यवसाय तोट्यात जात असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मात्र राजकारण सुरू असल्याची टीका होत आहे. जिल्ह्यात आत्महत्यांचा आकडा वाढत असून, एका महिन्यात २२ तर तालुक्यात ३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

### शेतकरी आर्थिक विवंचणेत

■ **कृषिप्रधान देशात अन्नधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ का यावी, असा सवाल उपस्थित केला जात आहे. दोन हजार रुपयांच्या अनुदानासाठी व पाच किलो धान्यासाठी वाट पाहण्याची वेळ शेतकऱ्यावर येत असल्याने संतापाची लाट उसळली आहे. शासनाने तात्काळ संपूर्ण कर्जमाफी जाहीर करून पीकविमा व अतिवृष्टी अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी,अशी जोरदार मागणी कळंब तालुक्यातून होत आहे.**

## सीसीआयमार्फत कापूस खरेदीस मुदतवाढ देण्याची मागणी

**विदर्भ केसरी।दर्यापूर :**



तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी CCI मार्फत सुरू असलेल्या कापूस खरेदीस मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. सध्या दर्यापूर केंद्रावर CCI मार्फत कापूस खरेदी सुरू असून ही खरेदी मुदत २७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांचा कापूस अद्याप विक्रीसाठी शिल्लक असून, विविध कारणांमुळे त्यांना वेळेत कापूस विक्री करता आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी खरेदी प्रक्रियेस मुदतवाढ देणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा व CCI मार्फत कापूस खरेदीस तातडीने मुदतवाढ जाहीर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे, संचालक राजेश पाटील खेडकर, संचालक प्रभाकर पाटील तराळ, संचालक भारत भाऊ आठवले, अजय भाऊ देशमुख, राहुल भाऊ गावंडे उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजार समिती कटिबद्ध असून पुढील काळातही शेतकरी हिताच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेण्यात येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## करंजीची सुवर्णकन्या निकिता अमरावतीत सुवर्णपदकाने सन्मानित

**विदर्भ केसरी। ढाणकी प्रतिनिधी मिलिंद चिकटे**



23 फेब्रुवारी 2026 रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा 42 वा दीक्षांत समारंभ मोठ्या थाटामाटात विद्यापीठाच्या परिसरात पार पडला या सोहळ्यात उमरखेड येथील गोपिकाबाई सिताराम गावंडे महाविद्यालयाची विद्यार्थिनी निकिता देवकते ला सुवर्णपदक देऊन विद्यापीठाने गौरविले. ग्रामीण भागात शैक्षणिक सेवा सुविधांचा अभाव असला तरी जर विद्यार्थ्यांमध्ये जिद्द चिकाटी आणि अथक मेहनत करण्याची तयारी आणि पालकांचे मुला-मुलींना खंबीर पाठबळ असेल तर आभाळाला ही गवसणी घालता येते.

गावंडे महाविद्यालयाची विद्यार्थीनं करंजीची सुवर्णकन्या निकिता पुणेश्वर देवकते हिने 23 फेब्रुवारी 2026 रोजी सिद्ध केले आहे.सन 2024 25 या शैक्षणिक वर्षात बीए तृतीय वर्षामध्ये स्नातक मराठी वांग्मयात स्व. श्रीमती सरस्वतीबाई आनंदराव राऊत सुवर्णपदक, श्री विनायकराव शंकरराव हुड रोप्यपदक, श्री भालचंद्र दामोदर बापट रोख पारितोषिक आणि श्रीमती यमुनाबाई गोडबोले रोख पारितोषिक स्नातक मराठी वांगमय परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकाची व पारितोषिकाची मानकरी ठरणारी निकिताने आपल्या ध्येयाचे क्षितिज गाठण्यासाठी उंच भरारी घेतली आणि आपल्या महाविद्यालया सोबत ज्या मातीत तिची जडणघडण झाली त्या करंजी गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल तिच्यावर कौतुकाचा आणि अभिनंदनचा वर्षाव सुरू आहे निकिता देवकते ही उमरखेड तालुक्यातील यवतमाळ जिल्ह्यातील बंदी भागातील छोट्याशा करंजी गावावरून दररोज 25 किलोमीटर अंतर महामंडळाच्या बसने प्रवास करावा लागत असे घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे अभ्यासासाठी कोणत्याच सोयीसुविधा नाहीत. निकिता सध्या अमरावती येथे पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात प्रथम वर्षात शिकत आहे लहान बहीण स्नेहा गडचिरोली जिल्ह्यात पोस्ट खात्यात नोकरी करत आहे तर भाऊ गणेश बीए प्रथम वर्षात शिकत आहे निकिताने प्रतिकूल परिस्थितीच सामना करत आपल्या देवकते कुटुंबाचा व करंजी गावचा नवलौकिक वाढविला आहे.

## वीज केंद्रात निविदा मॅनेजमेंटचा 'धूर'

### कंत्राटदारांचे तीव्र आंदोलन आणि आमरण उपोषण

**विदर्भ केसरी। चंद्रपूर:**



येथील महाऔद्योगिक विद्युत निर्मिती केंद्र (CSTPS) सध्या भ्रष्टाचाराच्या आरोपांनी आणि कंत्राटदारांच्या तीव्र आंदोलनाने ढवळून निघाले आहे. निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर 'मॅनेजमेंट' करून भ्रष्टाचार केला जात असल्याचा गंभीर आरोप सुनील दहिगावकर यांनी केला असून, याच्या चौकशीसाठी स्थानिक कंत्राटदारांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. वीज केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर (मेजर गेट) गेल्या दोन दिवसांपासून चार कंत्राटदारांचे आमरण उपोषण सुरू आहे. मात्र, प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे हे आंदोलन आता अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

■ **प्रशासकीय अनास्था आणि अनोखी आंदोलने**

उपोषण सुरू होऊन दोन दिवस उलटले तरी वीज केंद्राच्या एकाही वरिष्ठ अधिकाऱ्याने उपोषणकर्त्यांची भेट घेण्याचे सौजन्य दाखवलेले नाही. प्रशासनाच्या या 'मुजोर' वृत्तीचा निषेध करण्यासाठी स्थानिक तंत्रज्ञ आणि कंत्राटदारांनी आंदोलनाचे नवनवीन प्रकार अवलंबले आहेत:

**पहिला दिवस:** मेजर गेटसमोर तृतीयपंथीयांनी विजय राठोड हाय हाय चा नारा देत आंदोलन करून प्रशासनाचा निषेध केला.

**दुसरा दिवस:** उपोषण कर्त्यांना समर्थन देण्यासाठी उपस्थित कंत्राटदारांनी 'अर्धनग्न आंदोलन' करून, काका पुतण्या मुर्दाबाद अशे नारे देऊन प्रशासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला.

■ **राजकीय पक्षांचा वाढता पाठिंबा**

सुनील दहिगावकर यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या या आंदोलनाला चंद्रपुरातील राजकीय आणि सामाजिक स्तरातून मोठा पाठिंबा मिळत आहे. उपोषण मंडपात आतापर्यंत खालील पक्षांच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी भेटी देऊन आपला पाठिंबा दर्शविला आहे:

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व राष्ट्रवादी युवक काँग्रेस

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट)शिवसेना (शिंदे गट) काँग्रेस

**स्थानिक कामगार आणि सामाजिक संघटना**

"निविदा प्रक्रियेत पारदर्शकता नसून स्थानिकांना डावलले जात आहे. जर प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही, तर हे आंदोलन यापेक्षाही अधिक तीव्र होईल." — सुनील दहिगावकर, आंदोलनकर्ते

पुढील इशारा

स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवक आणि कंत्राटदारांमध्ये प्रशासनाविरुद्ध प्रचंड रोष असून, जोपर्यंत भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होत नाही तोपर्यंत मागे न हटण्याचा निर्धार आंदोलकांनी केला आहे. प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचा दणका; CCI केंद्रावर शेतकऱ्यांची अडवणूक थांबली

**विदर्भ केसरी। पांढरकवडा**

### सर्व कापूस खरेदी करण्याचे प्रशासनाचे आश्वासन



पांढरकवडा येथील Cotton Corporation of India (CCI) केंद्रावर कापूस उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली अडवणूक अखेर थांबली असून, सर्व शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आक्रमक भूमिकेनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

गेल्या काही दिवसांपासून CCI केंद्रावर कापूस विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना विविध तांत्रिक निकष, आर्द्रता प्रमाण आणि इतर अटींचा आधार घेत माल परत पाठवला जात असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत होता. अनेकांना पुन्हा वाहतूक खर्च करून कापूस आणावा लागत होता, तर काहींचा माल रखडला होता.

ही बाब स्थानिक शेतकऱ्यांनी मनसे तालुका अध्यक्ष आश्विन ठाकरे यांच्या निदर्शनास आणून दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी कार्यकर्त्यांसह CCI केंद्रावर धडक देत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या तक्रारींची माहिती देत अडवणूक तत्काळ थांबवण्याची मागणी केली.

"शेतकऱ्यांनी प्रचंड मेहनतीने पिकवलेला कापूस किरकोळ कारणांवरून नाकारणे अन्यायकारक आहे. शेतकऱ्यांची पिळवणूक सहन केली जाणार नाही," असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला. यावेळी काही काळ अधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये खडाजंगीही झाली.

प्रकरण चिघळण्याची चिन्हे दिसताच प्रशासनाने नमती भूमिका घेत सर्व शेतकऱ्यांचा कापूस जाचक अटींशिवाय खरेदी करण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर रखडलेली कापूस खरेदी प्रक्रिया सुरळीतपणे सुरू झाली आहे. मनसेच्या हस्तक्षेपामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त केली जात असून, पांढरकवडा परिसरात समाधानाचे वातावरण आहे.

## पोस्को कायद्याविषयी जनजागृती शिबिर

**विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**




दि. २६ फेब्रुवारी २०२६ तालुका विधी सेवा समिती,पुसद व वकील संघ पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने " कॉमन मिनिमम प्रोग्राम " अंतर्गत कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम अनुसूचित जाती मुलींची शासकीय निवासी शाळा, आसरपेंड,पुसद ता.पुसद जि.यवतमाळ येथे सकाळी ९.३० वाजता पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तदर्थ अतिरित व जिल्हा न्यायाधीश पुसद श्रीमती.सोनल एन.शाह मॅडम उपस्थित होत्या.तसेच पुसद वकील संघाचे कोषाध्यक्ष अॅड.अमोल एन.भालेराव तसेच मुख्याध्यापिका श्रीमती.सविता घरजारे मॅडम यांची उपस्थिती लाभली. या शिबिरात अॅड.जयश्री एस.देशमुख सदस्य,वकील संघ पुसद यांनी "Protection of Children from Sexual Offences Act, 2012" (POCSO Act) या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.त्यांनी पॉक्सो कायद्याचे उद्दिष्ट,बालकांचे हक्क,तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया,तसेच कायद्यातील तरतुदी व शिक्षांचे स्वरूप याविषयी विद्यार्थिनींना सोप्या भाषेत माहिती दिली. बालकांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी जागरूकता आणि तत्परता किती महत्त्वाची आहे,यावर त्यांनी विशेष भर दिला.

अध्यक्षीय भाषणात जिल्हा न्यायाधीश श्रीमती.सोनल एन.शाह यांनी विद्यार्थिनींना आत्मविश्वास बाळगण्याचे,कोणत्याही अनुचित प्रकाराविरुद्ध आवाज उठविण्याचे व कायद्याची मदत घेण्याचे आवाहन केले.अशा जनजागृती उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण होऊन त्यांना सुरक्षित वातावरण मिळण्यास मदत होते,असे त्यांनी नमूद केले.प्रत्येक मोठ्या यशाची सुरुवात एका छोट्या स्वप्नापासून होते.त्यामुळे सर्वप्रथम मोठे स्वप्न बघा.स्वप्न बघण्याची हिंमत ठेवा, कारण ज्यांना स्वप्न पाहण्याची सवय असते,त्यांनाच ते पूर्ण करण्याची ताकद मिळते.तुमचे ध्येय स्पष्ट ठेवा.ध्येय समोर ठेवून प्रामाणिकपणे मेहनत करा.अडचणी येतील,अपयश येईल,पण त्यातून शिकत पुढे जात राहा.स्वतःवर विश्वास ठेवा आणि "मी करू शकते" हा आत्मविश्वास कायम ठेवा. तुमच्यात अपार क्षमता आहे. योग्य दिशा, कठोर परिश्रम आणि सकारात्मक विचार यांच्या जोरावर तुम्ही कोणतेही स्वप्न पूर्ण करू शकता. तसेच स्वप्न मोठे बघा आणि ते पूर्ण करण्यासाठी डोळ्या समोर ध्येय ठेवा असा मूलमंत्र त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिनेश पवार सर यांनी केले तर आभार प्रदर्शन कु.आर्या भगत व कु.अनुष्का कोल्हे या विद्यार्थिनी नी करून शिबिराची सांगता करण्यात आली. या उपक्रमास पीयुष नाईक,मनिषा अमृते,दिनेश पवार,मंगेश लंबे,संदीप चव्हाण,प्रयाग राठोड न्यायालयीन कर्मचारी शशिकांत ढाले,पोलीस कर्मचारी गोपीचंद चव्हाण शाळेतील विद्यार्थिनी व शिक्षकवृंद,कर्मचारी यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## यशासाठी परिश्रमाला पर्याय नाही

### महाभारतफेम सागर साळुंके : स्वरगुंजन गृप च्या वतिने मूर्तिजापुरात सत्कार

**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर,:**



कुठल्याही क्षेत्रात यशोशिखर गाठायचे असेल, तर सातत्यपूर्ण व कठोर परीश्रमाला पर्याय नाही, असे स्वानुभवकथन महाभारत मालिकेत बलरामाची भूमिका प्रभावीपणे साकारणारे सिने कलावंत सागर साळुंके यांनी येथे केले.

'स्वर गुंजन' कराओके ग्रुप च्या वतीने येथील बियाणी जीन परीसरात गुरूवारी (ता.२६) आयोजित सत्कार समारंभात सत्काराला उत्तर देतांना ते बोलत होते.

प्रख्यात स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.विक्रम शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रा,अविनाश बेलाडकर व डॉ.कपील महाजन उपस्थित होते. सिमरण रामचरण राठोड या चिमुकलीने स्वागत गीतसादर केले.

येथील मुळ रहिवासी असून मुंबईत पोलीस दलात सेवा देत सहायक पोलीस आयुक्त पदावरून सेवानिवृत्त झालेले व बी.आर. चोप्रा यांच्या महाभारत मालिकेसह अनेक मालिका व चित्रपटांमधून भूमिका साकारणारे सागर साळुंके व इंडियाज ग्रेट टॅलेंट टीव्ही शो च्या टॉप 5 मध्ये निवड झालेली सिमरन रामचरण राठोड यांचा प्रोत्साहन यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ.प्रविण तांबडे यांनी केले. डॉ.प्रविण नागपूरे यांनी आभार मानले.

उद्योजक अनिल बियाणी, डॉ. रामचरण राठोड, डॉ. वंदना राठोड, सचिन बोनगिरे, विलास नसले, शैलेश अग्रवाल, प्रवीण भागवत, कृष्णा राठोड, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'स्वर गुंजन 'कराओके ग्रुप च्या गायकांसह सागर साळुंके यांनी यावेळी सिनेगितांचे अप्रतिम सादरीकरण केले व सागर साळुंके यांनी महाभारत मालिकेतील त्यांचा डायलॉग टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात सादर केला.

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
रविवार, १ मार्च २०२६ | ४
विदर्भ GOOD MORNING
!! मन-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## महत्त्वाचे



## रत्नाबाई राठी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश: NMMS परीक्षेत दहा विद्यार्थी उत्तीर्ण

**विदर्भ केसरी। दर्यापूर -(तालुका प्रतिनिधी)**

येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित रत्नाबाई राठी हायस्कूल दर्यापूर येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी असलेली शिष्यवृत्ती परीक्षा NMMS 2026 मध्ये नेत्र दिपक यश संपादन केले आहे. शाळेतील 10 विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत त्यामुळे शाळेच्या नाव लौकिकामध्ये भर पडली आहे. शाळेतील मिशन NMMS च्या टिमच्या अथक परिश्रमामुळे आणि योग्य मार्गदर्शनामुळे हा निकाल शक्य झाला आहे.यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. विशेष म्हणजे हे सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातील या यशामुळे त्यांच्या मध्ये स्पर्धा परीक्षे विषयी आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

**यशस्वी विद्यार्थ्यांची नावे**

1) साहिल किशोर सोळंके ( ST-66) 2) कुमारी वैष्णवी प्रमोद वानखडे(SC-64) 3) कुमारी वैष्णवी प्रवीण खंडारे(SC-63) 4)शेखर संतोष गव्हाळे(SC-75) 5) कुमारी अक्षरा संतोष अघम (SC-62) 6) कुमारी प्रगती राजेंद्र गवई (SC-64) 7) कुमारी आरुषी मोहन सरदार (SC-67) 8)कुमारी सुहाना संतोष चव्हाण (ST-58) 9)आदित्य मुकेश आठवले (SC-58) 10)कुमारी प्राची राजेंद्र आठवले(SC-68) या घवघवीत यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शाळा समिती अध्यक्षश्री हर्षवर्धन देशमुख, मा प्रा श्री केशवराव जी गावंडे कार्यकारणी सदस्य तथा शाळा समिती सदस्य, आदरणीय सर्व शाळा समिती सदस्य, श्री विनायक रावजी गावंडे शाळा तपासणी अधिकारी, श्री हेमंत रेचे माजी मुख्याध्यापक, श्री विलास मुळे प्र. मुख्याध्यापक , मिशन एन एम एम एस चे प्रभारी श्री राहुल महाजन, ज्येष्ठ शिक्षक श्री मेश्राम सर, शिक्षक प्रतिनिधी श्रीकृष्ण करडे, श्री निलेश काळे,श्री गजेंद्र हागोणे,सौ सारिका उपासे,सौ अश्विनी बुरघाटे, सौ अघडते, सौ ज्युली जामठे,विलास सोळंके,सर्व शिक्षक व संतोष सावळेशिक्षकेतर कर्मचारीप्रतिनिधी, प्रशांत होले,गणेशअघडते,यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत



## भव्य प्लास्टिक बॉलचे खुले दणदणीत सामने

**विदर्भ केसरी। दर्यापूर :**

दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा दर्यापूर तालुक्यातील थिलोरी येथे जय हनुमान क्रिकेट क्लब मित्र मंडळ थिलोरी व समस्त गावकरी मंडळीच्या वतीने भव्य प्लास्टिक बॉल क्रिकेटचे खुले दणदणीत सामन्यांचे आयोजित करण्यात आले आहेत. या क्रिकेट सामन्याचे उद्घाटन दर्यापूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुनील वानखडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व गावातील सामाजिक कार्यकर्ते शशांक धर्माळे ,अनिल होले, ज्ञानेश्वर होले, अनिल घुरडे, अमित होले ,सतीश चुडे, गोपाल धर्माळे, गावचे पोलीस पाटील आनंद वर्धे ,माजी पोलीस पाटील प्रभाकर राऊत बाळकृष्ण राऊत , तंटामुक्ती अध्यक्ष शेवानंद वाकपांजर, कृषी तंटामुक्ती अध्यक्ष राजेश पावडे , सामाजिक कार्यकर्ते विक्की पाटील होले, मनोज तांबडे, रोजगार सेवक राहुल वाकपांजर ,आधी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले .या क्रिकेट सामन्याचे आयोजन जय हनुमान क्रिकेट क्लब मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. आज पहिल्याच दिवशी पाच क्रिकेट टीम खेळण्यासाठी मैदानात उतरल्या होत्या. सदर क्रिकेट सामन्यात प्रथम बक्षीस रोख रक्कम 15 हजार रुपये द्वितीय बक्षीस 11 हजार रुपये व तृतीय बक्षीस 7000 रुपये असे विजेत्या क्रिकेट टीमला देण्यात येणार आहे. यासह ट्रॉफी व सन्मान चिन्ह सुद्धा विजेता टीमला मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त क्रिकेट टीमने या खेळाचा आनंद घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे

## ४०.५६ कोटी रुपये आर्णी नपचा अर्थसंकल्प

**विदर्भ केसरी। आर्णी,**

शुक'वार, २७ फेब्'वारी रोजी आर्णी नगर परिषद अध्यक्ष नालंदा भरणे यांनी नपचा २०२६-२०२७ साठी ४० कोटी ५६ रुपये बचतीचा अर्थसंकल्प सादर केला. भूमिगत गटारे व मूलभूत सुविधांच्या गरजा पूर्ण करण्यावर या अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. अध्यक्ष नालंदा भरणे यांनी शहरातील मूलभूत सुविधांच्या पूर्ततेवर भर दिला. शिक्षण व आरोग्यावर विशेष काम तसेच त्याची अंमलबजावणीदेखील केली जाईल. केंद्र सरकारच्या निधीतून होणाऱ्या नमो उद्यान योजनेंतर्गत निधीचा वापर करून मध्यभागी एक भव्य उद्यान साकारणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# एक्साईजच्या कारवाईवर प्रश्न

## साहेब, कोट्यवधींच्या कारवाईतील म्होरक्या केव्हा मिळणार?

**विदर्भ केसरी। यवतमाळ**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने यवतमाळ जिल्ह्यात मोठी कारवाई करत तब्बल ₹ 1,05,35,605 किमतीचा बनावट देशी व विदेशी मद्यसाठा जप्त केल्याचा दावा केला आहे. या कारवाईत एकूण ६८३ बॉक्स मद्यसाठा आणि तीन वाहने ताब्यात घेण्यात आली. मात्र या प्रकरणातील चालक घटनास्थळावरून पसार झाल्याने या कारवाईच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १० फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री राळेगाव–अल्लीपूर मार्गावरील कमळेश्वर फाटा येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाने सापळा रचला होता. खात्रीलायक माहितीच्या आधारे ४० ते ५० अधिकाऱ्यांचे पथक तैनात करण्यात आले होते. या कारवाईदरम्यान (MH 04 HD 0298) क्रमांकाचा अशोक लेलँड कंटेनर अडवण्यात आला. या



वाहनात अंड्याच्या कॅरेटखाली लपवून ठेवलेले तब्बल ६१३ बॉक्स बनावट मद्य आढळून आले. त्यानंतर (MH 30 BD 3881) क्रमांकाच्या टाटा योद्धा वाहनातून आणखी ३० बॉक्स मद्य जप्त करण्यात आले. दरम्यान, संशयित वाहनांचा पाठलाग करत उत्पादन शुल्क विभागाने वर्धा जिल्ह्याच्या हद्दीत (MH 29 BV 7227) क्रमांकाची किया सेल्टॉस कार अडवली. या वाहनातूनही ४० बॉक्स बनावट मद्य जप्त करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ६८३ बॉक्स मद्यसाठा आणि तीन वाहने विभागाने ताब्यात घेतली. मात्र, इतक्या मोठ्या कारवाईनंतरही तिन्ही वाहनांचे चालक अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या पथकाच्या उपस्थितीत आरोपी पसार कसे झाले, असा प्रश्न उपस्थित होत आहे. स्थानिक नागरिकांमध्ये या कारवाईबाबत विविध चर्चा सुरू असून, एवढ्या मोठ्या प्रमाणात मद्यसाठा जप्त होऊनही मुख्य आरोपी अद्याप फरार असल्याने तपासाच्या दिशेबाबत शंका व्यक्त केली जात आहे. उत्पादन शुल्क विभागाने या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याचे सांगितले असून, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती दिली आहे.

**जिल्ह्यातील अवैध मद्य तस्करीविरोधातील ही मोठी कारवाई मानली जात असली, तरी या प्रकरणातील मुख्य आरोपींचा शोध लागणे आणि तस्करीच्या साखळीचा उलगडा होणे, हेच या कारवाईचे खरे यश ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.**

### जप्तीतील दारूसाठा आहे का?

**कारवाईतील पंचनाम्यात जप्त केलेल्या मद्यसाठ्यावर अनेक कर्मचाऱ्यांनी ताव मारल्याच्या चर्चा आहे. याचा उलगडा होणे देखील गरजेचे आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी हित संबंध जपत बनावट दारूचे बंपर वाटप केल्याची खात्रीलायक माहिती सुत्रांनी दिली आहे. याबाबत एसपींनी चौकशी केल्यास घबाड बाहेर येईल, अशी शक्यता नाकारता येत नाही**

## खेळतांना रंग बाई...

### केमिकलयुक्त रंगांपासून सावधान!



**विदर्भ केसरी। यवतमाळ |**

रंग, आनंद आणि उत्साहाचा सण म्हणून ओळखली जाणारी रंगपंचमी साजरी करताना नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेणे गरजेचे झाले आहे. अलिकडच्या काळात बाजारात स्वस्त दरात उपलब्ध होणाऱ्या कृत्रिम व रासायनिक ('बोगस') रंगांचा वापर वाढल्याने त्वचा, डोळे आणि श्वसनसंस्थेशी संबंधित तक्रारी वाढताना दिसत आहेत. रासायनिक रंगांचा वाढता वापर पूर्वी फुलांपासून, हळद, चंदन किंवा इतर नैसर्गिक घटकांपासून तयार होणारे रंग वापरले जात असत. मात्र सध्या बाजारात मिळणाऱ्या अनेक रंगांमध्ये लेड, क्रोमियम, अभ्रक यांसारखी हानिकारक रसायने मिसळलेली असण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करतात. हे रंग गडद, पक्के आणि स्वस्त असल्याने त्यांचा वापर वाढत आहे; मात्र त्याचे दुष्परिणाम गंभीर ठरू शकतात. कृत्रिम रंगांमुळे त्वचेवर पुरळ, खाज, ॲलर्जी, जळजळ किंवा सूज येऊ शकते. संवेदनशील त्वचा असलेल्या व्यक्तींना हा त्रास अधिक जाणवू शकतो. डोळ्यांत रंग गेल्यास संसर्ग, लालसरपणा, सूज किंवा कॉर्नियाला इजा होण्याचा धोका असतो. वेळेवर उपचार न घेतल्यास दृष्टीवर परिणाम होऊ शकतो हवेत उडणाऱ्या रासायनिक गुलालामुळे दमा, श्वास घेण्यास त्रास, खोकला किंवा ॲलर्जीक प्रतिक्रिया उद्भवू शकतात. लहान मुले व ज्येष्ठ नागरिक यांना विशेष धोका संभवतो आरोग्य तज्ज्ञांच्या मते, रंगपंचमी साजरी करताना हर्बल किंवा नैसर्गिक रंगांचाच वापर करावा. गडद, पक्के व केमिकलयुक्त रंग टाळावेत. रंग खेळण्यापूर्वी त्वचेवर तेल किंवा मॉइश्चरायझर लावल्यास त्वचेचे संरक्षण होण्यास मदत होते. तसेच डोळ्यांचे रक्षण करण्यासाठी काळजी घ्यावी आणि जबरदस्तीने रंग लावणे टाळावे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, दमा किंवा त्वचारोग असलेल्या व्यक्तींनी विशेष खबरदारी घ्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे. परंपरेतील सात्विकता जपत आणि आरोग्याची जाणीव ठेवून रंगपंचमी साजरी करणे हीच आजच्या काळाची गरज असल्याचे नागरिकांकडूनही मत व्यक्त होत आहे.

## 6 व्या मजल्यावरून 6 कामगार कोसळले

**विदर्भ केसरी।**

राज्याची राजधानी असलेल्या मुंबईतील चेंबूर परिसरात एक भयंकर घटना घडली आहे. चेंबूरच्या सुभाष नगर भागातील एका निर्माणाधीन इमारतीच्या 6 व्या मजल्यावरून 6 कामगार कोसळलेत. या घटनेत एका कामगाराचा मृत्यू झाला असून, 5 जण जबर जखमी झालेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ माजली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, सुभाष नगर येथील एका आलिशान इमारतीचे वेगात बांधकाम सुरू आहे. शनिवारी दुपारी 12.05 च्या सुमारास या ठिकाणी कामगार नेहमीप्रमाणे काम करत होते. ते इमारतीच्या 6 व्या मजल्यावर बांधकाम करत होते. यावेळी 6 कामगार अचानक तोल जावून 80 ते 90 फूट उंचीवरून खाली कोसळले. या घटनेत 6 कामगार जबर जखमी झाले.

## डॉ. कैलास वानखडे इरावतींच्या ललित गद्याचे तटस्थ भाष्यकार - प्रतिमा इंगोले

**विदर्भ केसरी।**

मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून डॉ. कैलास वानखडे लिखित 'इरावती कर्वे यांच्या ललितगद्याची मीमांसा' या ग्रंथाचे प्रकाशन दि. 27/2/2026 रोजी दानापूर येथील प्रसिद्ध साहित्यिक, विदर्भभूषण प्रतिमाताई इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले. इरावती कर्वे ह्या लेखन करताना पारंपारिक लेखकांपेक्षा वेगळ्या प्रकारे लेखन करतात त्यामुळे त्यांचं साहित्य मला नेहमीच आवडत आलेलं आहे. परिपूर्ती, भोवरा आणि गंगाजल या लेखसंग्रहातील अनेक लेख मी वाचले असून ते लेख मला प्रचंड आवडलेले आहेत. जीवनातील वास्तव अनुभवांना ललित लेखनाचे स्वरूप देऊन, त्यातून आपल्या भावना व्यक्त करणे, हा इरावतींचा गुण आहे. आपल्या संस्कृतीमध्ये असलेले गुण जसे आपण गौरवतो तसेच आपल्या संस्कृतीमधील



दोषही आपण मांडले पाहिजे, हा इरावती बाईंचा दृष्टिकोन त्यांच्या लेखातून प्रकर्षाने जाणवते. कुटुंबातील, समाजातील विषमता या अनुषंगाने त्या विशेष अनुभव व्यक्त करतात. प्रा. डॉ. कैलास वानखडे यांनी इरावतींच्या एकूणच ललित लेखनाचे अचूक मर्म या ग्रंथात शोधल्याचे दिसून येते, असे मत त्यांनी मांडले आहे.

या ग्रंथाला डॉ. भास्कर पाटील यांची सविस्तर, प्रदीर्घ आणि अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना लाभलेली आहे. याप्रसंगी भाष्यकार म्हणून डॉ. भास्कर पाटील उपस्थित होते. इरावतींच्या ललित लेखातून व्यक्त झालेल्या विचारांवर डॉ. कैलास वानखडे यांनी केलेली मीमांसा अत्यंत परखड आणि मूलग्राही असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इरावतींच्या विविध सकारात्मक भूमिकांचे जसे लेखकाने समर्थन केले आहे तसेच त्यांच्यातील बोटचेपी प्रवृत्तीलाही अचूक हेरले असल्याचे डॉ. पाटील यांनी नमूद केले आहे.

हा ग्रंथ प्रकाशित करणारे ग्रॅव्हिटी पब्लिकेशनच्या संचालक सौ वर्षाताई राजू चिमणकर यांनी इरावतींच्या लेखनाचे कौतुक तर केलेच शिवाय या ग्रंथाचे लेखक प्रा. डॉ. कैलास वानखडे यांनी केलेल्या मिमांसेचे कौतुक करून, पुढील काळातही अशाच प्रकारची समीक्षा आपल्या हातून घडत राहो आणि वाचकांची वाचनाची भूक भागत राहो, अशा शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. भास्कर धारणे यांनी मराठी विभागाच्या समृद्ध परंपरेला उजाळा दिला. डॉ. वानखडे यांचे यापूर्वीचे लेखनही जसे दर्जेदार आहे, तसेच हे लेखन सुद्धा दर्जेदार आहे आणि यानंतरही असेच वांगमयीन कार्य त्यांच्या हातून घडत राहो अशा शुभेच्छा त्यांनी याप्रसंगी दिल्या.

अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. आर. डी. सिकची यांनी मराठी वांग्मय, मराठी भाषा आणि मराठी साहित्य या अनुषंगाने आपले वैयक्तिक अनुभव आपल्या खास मिश्किल शैलीने सादर करून श्रोत्यांची मने जिंकून घेतली

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन प्रा. डॉ. दिपाली सोसे यांनी केले. आभार मानताना प्रा. डॉ. कैलास वानखडे यांनी आपल्या ग्रंथाच्या निर्मितीमागची प्रेरणा व सहकार्य याविषयी कृतज्ञता व्यक्त करून महाविद्यालयाचे विशेष आभार मानले आहे.

मराठी विभागातील प्रा. डॉ. हरिचंद नरेटी, डॉ. सविता रेखे, प्रा. अर्चना बोंडे, प्रा. सुनीता डाबेराव, प्रा. सीमा चिमणकर, डॉ. दिवाकर सदांशीव यांच्यासह सीताबाई महाविद्यालयातील सर्व विषयाचे विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक वृंद, सर्व विषयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'हारे का सहारा, शामबाबाबा हमारा'

## मूर्तिजापुरात भक्तिचा महासागर भव्य निशान यात्रेने शहर झाले 'श्याममय'.

**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

राजस्थानमधील पवित्र खाटू श्यामजी मंदिरात साजरा होणाऱ्या फाल्गुनोत्सवाच्या पार्श्वभूमीवर, मूर्तिजापूर शहरातही भक्तीचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. श्याम फाल्गुनोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य निशान यात्रेने संपूर्ण शहर "हारे का सहारा, बाबा श्याम हमारा" च्या जयघोषाने दुमदुमून गेले. निशान यात्रेने शहरात चैतन्य शुक्रवारी, २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७:१५ वाजता गजानन महाराज मंदिरापासून भगव्या निशानींच्या (ध्वज) साक्षीने यात्रेचा उत्साहात





प्रारंभ झाला. ढोल-ताशांचा गजरात, टाळ-मृदंगाचा नाद आणि पुष्पवृष्टी करत निघालेली ही यात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत श्याम धाम मंदिरात पोहोचली. तिथे आरती, चहा-पाणी आणि प्रसाद वितरणाने यात्रेचा भावपूर्ण समारोप झाला. या पावन प्रसंगी महिला, तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. हातात भगवे ध्वज आणि मुखी 'श्याम' नाम यामुळे संपूर्ण शहर भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले होते. भक्तांच्या आग्रहास्तव मंदिराचे द्वार दिवसभर दर्शनासाठी उघडे ठेवण्यात आले होते, ज्याचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. भजन संध्या आणि महाप्रसाद प्रसाद व्यवस्था भाविकांसाठी दिवसभर साबुदाणा खिचडीच्या प्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. कारंजा येथील एका श्यामभक्ताच्या सहकार्यातून हा उपक्रम पार पडला.

भजन संध्या संध्याकाळी दर्यापूर रोडवरील जे. नथमल अँड भवानजी जिनिंग फॅक्टरी परिसरात भव्य 'भजन संध्या' आयोजित करण्यात आली होती. नामांकित भजन गायकांच्या मधुर आवाजाने वातावरण भक्तिमय झाले होते.

महाप्रसाद: दुसऱ्या दिवशी, २८ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या महाप्रसादाची संपूर्ण व्यवस्था श्यामभक्त सचिनभाऊ खोकले यांच्या वतीने करण्यात आली होती. फाल्गुन महिन्यातील हा पावन उत्सव केवळ एक धार्मिक कार्यक्रम न ठरता श्रद्धा, भक्ती व सामूहिक एकतेचे प्रतीक ठरला. मूर्तिजापूरने पुन्हा एकदा आपल्या भक्ती परंपरेचा वारसा जपत संपूर्ण शहर 'श्याममय' करून सोडले.

## श्याम राठोड यांनी दाखल केली उमेदवारी.



**विदर्भ केसरी। मानोरा :--**

तालुक्यातील तीर्थक्षेत्र अमरगड (वाई गौळ) निवासी श्याम विठ्ठल राठोड यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अकोला वाशिम च्या सार्वत्रिक निवडणुकी साठी विशेष कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदारसंघातून आपला दावा आज दाखल केला. श्याम राठोड हे अमरगड (वाई गौळ) पंचक्रोशी मध्ये आपल्या सामाजिक कार्यामुळे परिचित असून त्यांच्या सौभाग्यवती पंचायत समितीच्या यापूर्वी सदस्या राहिल्याने राठोड यांचा परिसरामध्ये मोठा जनसंपर्क आहे. अकोला वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकी साठी मानोरा तालुक्यातून अनेक दिग्गज इच्छुक असून श्याम विठ्ठल राठोड हा नवा चेहरा यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदी होऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये उमेदवारी दाखल केलेल्या राजकीय व सहकार क्षेत्रातील मातब्बरांना कशी टक्कर देतात याकडे तालुक्याचे लक्ष श्याम राठोड यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जावरून लागलेले आहे.

# गरिब जनतेच्या तोंडचा घास हिरावणार?

## अतिक्रमण हटावचा धसका: रिसोडच्या रस्त्यावर नगर परिषदेचा सायरन

**विदर्भ केसरी। रिसोड प्रतिनिधी -प्रदिप खंडारे**



रस्त्यावरील रहदारीला शिस्त लावण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली असली,तरी रिसोड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते लोणी फाटा परिसरातील अतिक्रमणावर आता नगर परिषदेचा हातोडा पडणार आहे.नगर परिषदेचा 'अतिक्रमण हटाव'चा रिक्षा शहरात फिरू लागल्याने हातावर पोट असणाऱ्या शेकडो गोरगरीब कुटुंबांचे धाबे दणाणले असून,या कारवाईमुळे अनेक छोटे व्यावसायिक रस्त्यावर येण्याची भीती निर्माण झाली आहे. या संदर्भात सविस्तर वृत्त असे की, शहरातील मुख्य वर्दळीचा रस्ता असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते लोणी फाटा या दरम्यान मोठ्या प्रमाणावर छोटे विक्रेते आणि फेरीवाल्यांनी आपली दुकाने थाटली आहेत.गुरुवारी (दि. २६) फेब्रुवारी २०२६ रोजी नगर परिषदेने ध्वनिक्षेपकाद्वारे ही अतिक्रमणे स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन केले.मात्र, या कारवाईचा सर्वाधिक फटका भाजीपाला आणि फळ विक्रेत्यांना बसणार आहे.या कारवाईत तक्रारकर्ते तथा पथविक्रेते समितीचे सदस्य जालिंदर देवकर यांनी प्रशासनाच्या या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वर्षानुवर्षे याच ठिकाणी व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या गरिबांना पर्यायी जागा न देता हुसकावून लावणे अन्यायकारक असल्याची भावना स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे. नगर परिषदेने शहराच्या सौंदर्यीकरणासाठी पावले उचलणे योग्य असले,तरी यामुळे कोणाच्या घराची चूल विझू नये,अशी माफक अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आता प्रशासन या छोट्या व्यावसायिकांसाठी पुनर्वसनाचा मार्ग मोकळा करते की थेट कारवाईचा बडगा उगारते,याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### आधी हक्काची जागा द्या, मगच कारवाई करा!

**शहरातील मुख्य मार्गावरील अतिक्रमण काढण्यापूर्वी नगर परिषदेने भाजीपाला आणि फळ विक्रेत्यांना पर्यायी जागा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. जालिंदर देवकर यांच्या मते, जर कोणतीही पर्यायी व्यवस्था न करता थेट कारवाई केली, तर शेकडो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येईल. शहरातील गरीब जनतेच्या रोजगाराचा प्रश्न आधी मार्गी लावावा आणि त्यानंतरच रस्ते मोकळे करावेत,अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.**

# श्री गोविंद विद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

**विदर्भ केसरी। तालुका प्रतिनिधी,**

मंगरूळपीर: श्री गोविंद विद्यालय पार्डी ताड येथे कवी कुसुमाग्रज म्हणजेच ज्येष्ठ साहित्यिक, कादंबरीकार वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी गौरव दिन आज दिनांक २७ फेब्रुवारी रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सदानंद ठाकरे यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करण्यात आले. यानंतर विनोदी बाल नाटिका प्रथमेश कातडे, कार्तिक गावंडे, सार्थक मिरासे, समर्थ मस्के, आरव जाधव, रितेश ढळे, कुणाल लांभाडे, शुभ्रा सावरकर, ईश्वरी शेंद्रे, जयश्री जाधव, तन्वी येलकर, नंदिनी गावंडे, यांनी सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. यानंतर अनुष्का भगत,



ईश्वरी कुरवाडे व मोहिनी बोथे यांनी ही मायभूमी ही जन्मभूमी हे गीत उत्कृष्ट गायन तथा नृत्य करून सादरीकरण केले. यानंतर हर्षदा सावके, प्रणाली येलकर, सानिका पानभरे, गौरी कुरवाडे, ज्ञानेश्वरी सावके, श्रद्धा लांभाडे, श्रावणी कुटे, दिव्या भगत, अक्षरा पानभरे या विद्यार्थ्यांनी कवी कुसुमाग्रज यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. यानंतर मीना नानुटे, व कार्यक्रमाचे अध्यक्ष सदानंद ठाकरे यांनी कवी कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेमध्ये उत्कृष्ट साहित्य तयार केले त्याचे आपण संवर्धन केले पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश ठाकरे, अणेश मस्के यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गोपाल गावंडे यांनी तर आभार प्रदर्शन मीना नानुटे यांनी केले.

## सामाजिक न्याय विभागाच्या विविध पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने समाज कल्याण क्षेत्रात कार्य करणा-या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था व उल्लेखनीय कार्य करणारे समाजसेवक/ व्यक्ती यांना दरवर्षी विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन 2024- 2025 व 2025-26 या वर्षासाठी देण्यात येणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार, संत रविदास पुरस्कार, लोककवी वामनदादा कर्डक पुरस्कार, शाहु- फुले- आंबेडकर पारितोषिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार या विविध पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पुरस्कार सन 2024-25 व 2025-26 साठी देण्याकरीता गडचिरोली जिल्हयातील समाज कल्याण क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणा-या इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी रितसर अर्ज उपरोक्त पुरस्कारासाठी, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण गडचिरोली या कार्यालयात दिनांक 15/03/2026 रोजी पुर्वी अर्ज सादर करण्यात यावेत. अर्जाचा नमुना प्रत कार्यालयातुन प्राप्त करुन घ्यावे व अधिक माहितीसाठी या कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधावा असे आवाहन डॉ.सचिन मडावी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण गडचिरोली यांनी केले आहे.

## संक्षीप्त



### श्रीराम मधुकर इंगळे यांच्या शेतात संत्र्याची यशस्वी तोडणी; भरघोस उत्पादनाने समाधान

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

वाशिम तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी अमोल इंगळे व श्रीराम मधुकर इंगळे यांच्या शेतातील संत्रा पिकाची नुकतीच यशस्वी तोडणी करण्यात आली. एका शासकीय योजनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या या संत्रा बागेतील भरलेला, आकर्षक व दर्जेदार संत्रा पाहून शेतकऱ्यांच्या मनात आनंदाची भावना निर्माण झाली. इंगळे यांच्या शेतात सुमारे ४०० संत्रा झाडे असून यावर्षी भरघोस उत्पादन मिळत आहे. योग्य नियोजन, वेळेवर खत व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण तसेच कृषी विभागाच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे हा उत्तम हंगाम साध्य झाल्याचे त्यांनी सांगितले. याबद्दल त्यांनी कृषी विभागाचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी कृषी सहाय्यक सुनिल गोटे यांनी इतर शेतकऱ्यांनीही अशा योजनांचा लाभ घ्यावा व आधुनिक पद्धतीने फळबाग लागवड करून उत्पादन वाढवावे, असे आवाहन केले. या प्रसंगी शेतकरी गजानन कड, गोपाल पवार, राम गाभणे, संतोष ढगे व राजु इंगळे उपस्थित होते. सध्या बाजारात संत्र्याला चांगला दर मिळत असल्याने हा हंगाम आर्थिकदृष्ट्याही समाधानकारक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. इंगळे यांच्या यशामुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांनाही संत्रा लागवडीसाठी प्रेरणा मिळत आहे.




### प्रहार शिक्षक संघटनेचा आदर्श शिक्षक सरकारला परत करणार आदर्श शिक्षक पुरस्कार

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : सतीश भालेराव**

नागपूर : प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत आपली बाजू मांडली सरकारने काही शाळा बंद केल्या. त्यामध्ये शिक्षक भयावह झाले व शिक्षण बंद झाले तर शिक्षणापासून विद्यार्थी वंचित राहील. त्यासाठी प्रहार शिक्षक संघटनेने पुढाकार घेतला व सरकारला इशारा दिला की, शिक्षकांच्या सुरक्षेतेसाठी व विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी शिक्षण क्षेत्रात प्रहार शिक्षक संघटना काम करीत आहे. शिक्षण क्षेत्रात भयमुक्त व चांगले वातावरण निर्माण झाले पाहिजे. यासाठी प्रहार शिक्षक संघटना कटिबद्ध आहे. राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार परत करण्याचा इशारा शासनाला देण्याचा निर्णय प्रहार शिक्षक संघटनेने घेतलेला आहे. शिक्षण क्षेत्रात प्रचंड समस्या निर्माण झाल्यात, शिक्षक हतबल झालेले आहेत, आंदोलन करून देखील दखल घेतल्या जात नाही. शेवटी वैतागून आजपर्यंत ज्यांना ज्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाले आहे ते सर्व पुरस्कार प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वात लवकरच शिक्षण मंत्राकडे सुपूर्द करण्यात येईल. प्रहार शिक्षक संघटना नागपूर जिल्ह्याच्या वतीने पत्रपरिषद घेण्यात आली त्यावेळी नागपूर विभागाचे प्रमुख अजय भोयर यांनी प्रहार शिक्षक संघटने तर्फे इशारा दिला. यावेळी पत्रपरिषदेत प्रहार शिक्षक संघटनेचे नागपूर विभाग अध्यक्ष अजय भोयर, गजानन कुरवाडे, राजकुमार तिरभाने, धनराज कावटे, नागपूर जिल्हाध्यक्ष योगराज ढेंगे, जिल्हा सचिव पृथ्वीसिंग चव्हाण आणि विजय काळे सह उपस्थित होते.




### स्वच्छतेकडे दुर्लक्ष ; पाच वर्षांच्या कार्यकाळात विकासनिधी खर्चाचा प्रश्न उपस्थित

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : लक्ष्मीनारायण आडेटी**

सिरोंचा :- तालुक्यातील रंगय्यापल्ली गावातील आंबेडकर चौक परिसरात सामाजिक कार्यकर्ता महेश आकुदारी यांच्या घरासमोर सांडपाणी साचल्याने व नालीची नियमित साफसफाई न झाल्याने नागरिकांना अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे. परिसरात कचरा, गाळ व झाडाझुडपांमुळे नाली तुंबलेली असून दुर्गंधी पसरत आहे. यामुळे डासांची उत्पत्ती वाढून आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मागील काही वर्षांपासून या समस्येकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत आहे. स्वच्छ भारत अभियान व ग्रामीण स्वच्छता योजनांच्या अंमलबजावणीबाबत प्रश्न उपस्थित होत असून, नियमित साफसफाई व देखभाल न झाल्याची तक्रार आहे. ग्रामपंचायतीच्या पाच वर्षांच्या कार्यकाळात विविध विकासकामांसाठी निधी खर्च झाल्याचे दाखवले जात असताना, मूलभूत स्वच्छता व्यवस्थेकडे दुर्लक्ष का होते आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित ठिकाणी तात्काळ नालीची साफसफाई, पाणी वाहून जाण्याची योग्य व्यवस्था व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने पाहणी करून आवश्यक कार्यवाही करावी, अन्यथा संबंधित विभागाकडे लेखी तक्रार देण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

### नलिनीबाई कवाडकर यांचे निधन



कुरखेडा : येथील प्रतिष्ठित नागरिक तथा सेवानिवृत्त शिक्षक चरणदास कवाडकर यांच्या धर्मपत्नी नलिनीबाई चरणदास कवाडकर (६०) यांचा आज दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोज शनिवारला पहाटे ४ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले असून त्यांच्या पार्थिव शरीरावर सती नदीच्या काठावर दुपारी ३ वाजता अंतिम संस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात त्यांना पती, दोन मुले सुना व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# कोरची वासीयांच्या आरोग्याशी खेळ: प्रशासनाचे दुर्लक्ष की जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

## मालवाहू वाहनांनी रस्ते उखडले ; धुळीच्या साम्राज्यामुळे नागरिक हैराण, अपघातांचे सत्र सुरूच

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कोरची : गडचिरोली जिल्ह्याच्या उत्तर-पूर्व सीमेवर वसलेला आणि छत्तीसगड राज्याला जोडणारा महत्त्वाचा दुवा असलेला 'कोरची' तालुका सध्या विकासकामांच्या नावाने 'वनवासात' असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्हा मुख्यालयापासून १२० किमी अंतरावर असलेल्या या नगरपंचायत क्षेत्रात सध्या धुळीचे लोट आणि खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून, प्रशासकीय दिरंगाईमुळे सामान्य जनतेचे आरोग्य आणि जीव धोक्यात आला आहे. अवजड वाहनांचा विळखा आणि रस्त्याची दैना छत्तीसगड राज्याला जोडणाऱ्या या राज्य मार्गावरून दररोज सुरजागड लोह प्रकल्पातील कच्चा माल वाहून नेणारी हजारो अवजड वाहने धावतात. या अवजड वाहतुकीमुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. कोरची नगरपंचायतीच्या अगदी जवळून जाणाऱ्या या मुख्य रस्त्याच्या दुरावस्थेमुळे संपूर्ण परिसरात धुळीचे लोट पसरत आहेत. रस्ता दुरुस्तीचे काम 'कासवगतीने' सुरू असल्याने नागरिकांच्या संतापाचा बांध आता फुटू लागला आहे.

### आरोग्य आणि शिक्षण केंद्रांना धुळीचा विळखा

■ ज्या मार्गावर ही भीषण परिस्थिती आहे, त्याच परिसरात तहसील कार्यालय, पंचायत समिती आणि सरकारी दवाखाना यांसारखी महत्त्वाची शासकीय कार्यालये आहेत. विशेष म्हणजे, याच भागात आश्रमशाळा, एकलव्य रेसिडेन्शिअल स्कूल, वनश्री महाविद्यालय, आय.टी. आय., आणि वसतिगृह आहेत. हजारो विद्यार्थी आणि रुग्णांना याच विषारी धुळीचा सामना करावा लागत आहे. धुळीमुळे श्वसनाचे विकार बळावत असून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.







■ रोज हजारो ट्रक धुळ उडवत जातात, घरात राहणे मुश्किल झाले आहे. सरकारी कामासाठी दवाखान्यात जाताना धूळ खात जावे लागते. जर लवकरात लवकर रस्त्याचे काम पूर्ण झाले नाही, तर आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल.
**स्थानिक नागरिक, कोरची.**

### बायपास की 'डेथ ट्रॅप'?

■ गेल्या अनेक वर्षांपासून या बायपास रस्त्याची दयनीय अवस्था आहे. नगरपंचायत अंतर्गत सुरू असलेली संथ कामे आणि रखडलेला बायपास यामुळे नागरिक त्रस्त आहेत. या खराब रस्त्यामुळे आतापर्यंत अनेक छोटे-मोठे अपघात झाले असून काहींना नाहक आपला जीवही गमवावा लागला आहे. तरीही प्रशासन आणि लोकप्रतिनिधी याकडे डोळेझाक का करत आहेत? असा सवाल संतप्त नागरिक विचारत आहेत.

### कुरखेडा येथे शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्र.01 हा दिनांक 18 फेब्रुवारी 2025 ते 15 मे 2026 या कालावधीमध्ये कढोली मंडळात दिनांक 07.03.2026 रोजी, मालेवाडा मंडळात दिनांक 14.03.2026 रोजी, पुराडा मंडळात दिनांक 10.04.2026 रोजी व कुरखेडा मंडळात दिनांक 08.05.2026 रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात आलेला आहे. उपरोक्त कालावधीत संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ सेवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा सेवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग सेवा निवृत्ती वेतन योजना इत्यादीपैकी एका विशिष्ट योजनेचा लाभ मिळण्यास पात्र असणा-या सर्व संभाव्य पात्र लाभार्थ्यांना महसूल सेवक हे आपलेकडे गृहभेट देणार आहेत. तरी, संबंधीत लाभार्थ्यांनी त्यांचे आधारकार्डशी मोबाईल क्रमांक व बँक खाते क्रमांक जोडलेला नसल्यास तातडीने नजीकचे आधारकेंद्रात जावून आधारकार्ड अद्यावत करून घ्यावे. तसेच त्यांचे बँक खाते क्रमांकाशी आधारकार्ड क्रमांक व मोबाईल क्रमांक जोडलेला नसल्यास तातडीने संबंधीत बँकेत जावून त्यांचे बँक खाते क्रमांकाशी आधारकार्ड क्रमांक व मोबाईल क्रमांक जोडून घ्यावे. व गृहभेटीसाठी आलेल्या महसूल सेवकास प्रकरणातील आवश्यक संपुर्ण दस्तऐवज देणे व अर्जातील माहिती भरून घेण्यासाठी आपल्या घरी थांबून राहावे. असे आवाहन तहसिलदार, कुरखेडा यांनी केले आहे.

## बसस्थानक प्रमुख श्रीधर शिवणकर यांचे श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने केला सत्कार

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**



कुरखेडा : येथील बसस्थानकचे बस स्थानक प्रमुख श्रीधर शिवणकर यांच्या सेवानिवृतीपर आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्था कुरखेडा द्वारा संचालित श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा यांच्या वतीने बस स्थानक प्रमुख श्रीधर शिवणकर यांनी आपल्या कार्यकाळात शालेय विद्यार्थ्यांच्या बसेसच्या समस्या दूर करण्यासाठी व मानव विकास मिशन अंतर्गत चालणाऱ्या बसेस व अहिल्याबाई होळकर विद्यार्थिनी पास या संदर्भात त्यांच्या उत्तम कार्याची दखल घेत संस्था कोषाध्यक्ष तथा शाळा समिती अध्यक्ष वामनराव फाये यांच्या शुभहस्ते यांचा सत्कार करण्यात आला आहे. यावेळी व्यासपीठावर शाळा समिती अध्यक्ष वामनराव फाये प्राचार्य नागेश्वर फाये, साहित्यिक कुंभारे शिक्षक कवयित्री तथा लेखिका जोशना बनसोड , संजय शिरपूरवर, वासुदेव मस्के, प्रा. प्रदीप पाटणकर,प्रा.विनोद नागपूरकर उपस्थित होते. बस स्थानक श्रीधर शिवणकर यांनी कुरखेडा बस स्थानकाचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी बसेसच्या वेळापत्रकाचे नियंत्रण प्रवाशांची सुरक्षा व सोयीसुविधांची काळजी घेण्यासाठी आणि स्थानकावरील स्वच्छता व प्रशासकीय कामकाजासाठी जबाबदार कर्मचारी म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले आहे त्याच्या या कार्याची दखल घेत श्रीराम विद्यालय त्याचा उच्च माध्यमिक विद्यालय कुरखेडा यांच्यावतीने शाल शिरपूर पुष्पगुच्छ व भेटवस्तू त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनोद नागपूरकर यांनी केले तर आभार संजय शिरपूरवार आणि मानले.

## शालांत परिक्षेतील विद्यार्थ्यांचे क्रीडा गुण सवलत प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याचे आवाहन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या जिल्हा/विभाग/राज्य स्तरावरील क्रीडा स्पर्धेत प्राविण्य संपादन केलेल्या तसेच राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य संपादन केलेल्या/ सहभागी झालेल्या खेळाडु विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्यासंदर्भात दिनांक 20 डिसेंबर 2018 रोजीचे शासन निर्णयान्वये कळविण्यात आले आहे. या शासन निर्णयामधील परिशिष्ट क्र. 6 व 7 मध्ये सुधारणा करण्यात आली असुन याबाबत दिनांक 25 जानेवारी 2019 चे शासन शुध्दीपत्रक काढण्यात आले आहे. सदर शासन निर्णयानुसार सन 2025-26 या शैक्षणीक वर्षात ईयत्ता 10 वी व ईयत्ता 12 वी मधील खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण मिळणेसाठीचे प्रस्ताव शालेयस्तरावरून ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहे. सन 2025-26 पासुन ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रिया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा दि. 25/02/2026 पासून निर्माण करुन देण्यात आली आहे. ईयत्ता 12 वी मध्ये असलेल्या खेळाडूने इयत्ता 10 वी ची गुणपत्रीका ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच एखाद्या खेळाडू विद्यार्थ्याने इ. 6 वी ते 10 वी या इयत्तेमध्ये प्राविण्य मिळविलेले असेल व याकरीता असलेले सवलतीचे गुणांचा लाभ एकदा घेतला असेल तर त्याला पुन्हा ईयत्ता 12 वी करीता सवलतीचे गुणांचा लाभ घेता येणार नाही. तसेच विद्यमान सत्रात तो खेळाडू संबंधित खेळाच्या स्पर्धेत सहभागी होणे आवश्यक आहे. शासन निर्णयातील सर्व निकषानुसार पात्र असलेले प्रस्ताव शाळा/ महाविद्यालयांनी, शालेय स्पर्धेतील खेळाडूंकरीता प्रत्येक खेळाडूंचे फॉर्म क्र. 1 व 2, खेळाडूचे स्वतंत्र हॉल तिकीट, संबंधित खेळाचे प्रमाणपत्र, आधारकार्ड ची सत्यप्रत व चलान इत्यादीसह मुख्याध्यापकाचे स्वाक्षरी व शिक्कासह ऑनलाईन अपलोड करावे. शासन निर्णय दि. 20 डिसेंबर 2018 अन्वये परिशिष्ठ क्र.10 अन्वये वैयक्तीक व सांघिक खेळाडूंची माहिती जिल्हा / राज्य संघटनेमार्फत सादर करणे आवश्यक आहे. तसेच एकविध खेळाच्या अधिकृत संघटनांनी शासन निर्णयातील परिशिष्ट 4 व 5 नुसार जिल्हास्तर, विभागस्तर व राज्यस्तर क्रीडा स्पर्धेचा संपूर्ण विस्तृत अहवाल या कार्यालयास सादर करावा. संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी खेळाडूंचे परिपुर्ण प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने दिनांक 05 एप्रिल 2026 पर्यंत https://aaplesarkar.mahaonline.gov.in या वेब साईट वर दिलेल्या कालावधीत सादर करावे. विहित वेळेत प्रस्ताव प्राप्त न झाल्यास उशीरा आलेल्या प्रस्तावांचा विचार करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत शाळेचे मुख्याध्यापक यांची राहील असे जिल्हा क्रीडा अधिकारी गडचिरोली, भास्कर घटाळे यांनी कळविले आहे.

# मुक्तेश्वर काटवे यांच्या निधनाने गडचिरोलीकर शोकसागरात

## माजी खासदार डॉ. अशोकजी नेते तथा विविध पदाधिकारी यांची अंत्यविधीला उपस्थिती

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गडचिरोली शहराच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनात आपली वेगळी छाप उमटविणारे भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, गडचिरोली नगरपरिषदचे आरोग्य व स्वच्छता सभापती तथा नगरसेवक मुक्तेश्वर काटवे यांचे दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या अकस्मात जाण्याने संपूर्ण गडचिरोली शहर शोकसागरात बुडाले असून जनजीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. सामाजिक, राजकीय आणि सार्वजनिक क्षेत्रात त्यांनी प्रामाणिकपणे, निस्वार्थ भावनेने दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील. स्वच्छता, आरोग्य आणि नगरविकासाच्या कामात त्यांनी दाखविलेली तळमळ व बांधिलकी ही सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली. माजी शहराध्यक्ष म्हणूनही त्यांनी संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या पार्थिवावर आज दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ (शनिवार) रोजी दुपारी १:०० वाजता वैनगंगा नदी, बोरमाळा घाट, गडचिरोली येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक, पदाधिकारी, नातेवाईक व मित्रपरिवार उपस्थित होते. अंत्यविधीप्रसंगी आयोजित शोकसभेत माजी खासदार तथा भाजपा अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. अशोकजी नेते यांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली. त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "मा. मुक्तेश्वरजी काटवे यांचे कार्य, त्यांचा साधा व मनमिळावू स्वभाव आणि समाजाप्रती असलेली निष्ठा सदैव स्मरणात राहील. त्यांच्या जाण्याने भाजप परिवारासह गडचिरोली जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे." यावेळी माजी आमदार तथा प्रदेशाध्यक्ष आदिवासी मोर्चा डॉ. देवरावजी होळी, जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे, माजी जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, डॉ. नितीन कोडवते, राष्ट्रवादी नेते रविंद्र वासेकर, उपनगराध्यक्ष निखिल चरडे,सभापती अनिल कुनघाडकर, हर्षल गेडाम, नगरसेवक सागर निंबोरकर, लिलाधर भरडकर, रमेशजी भुरसे, प्रमोद पिपरे, विलास पा.भांडेकर, आनंद भांडेकर, डॉ. भारत खटी,अनिल पोहनकर, सुधाकर व गजानन येंगदवार, अरुण भांडेकर,चंद्रशेखर भंडागे,प्रकाश ताकसांडे,भास्कर बुरे, रेवनाथ कुसराम, प्रकाश निकुरे, नितेश / बंटि खडसे, दिनेश नवघडे, कावडेजी आदी मान्यवर उपस्थित होते. शोकसभेचे प्रास्ताविक व संचालन नगरसेवक रमेश चौधरी यांनी केले. सभेदरम्यान दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली वाहण्यात आली. अनेक मान्यवरांनी आपल्या भाषणातून त्यांच्या स्वभावातील साधेपणा, कर्तव्यदक्षता आणि लोकांशी असलेली आत्मीयता यावर प्रकाश टाकला. यासोबतच नायब तहसिलदार अनिल भांडेकर यांच्याही अंत्यविधीला मा.खा. डॉ. नेते यांनी उपस्थिती राहुन भावपूर्ण श्रद्धांजली वाहली.. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो व काटवे यांच्या परिवारास हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, हीच सर्वांची प्रार्थना.








## पुलखल येथे तरुणाची गळफास लावून आत्महत्या...!


**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : जिल्हा मुख्यालयापासून जवळच असलेल्या पुलखल येथे एका २२ वर्षीय तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. धीरज पुरुषोत्तम रोठे असे मृत तरुणाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, धीरजची आई शेताच्या कामानिमित्त घराबाहेर गेली होती, तर वडीलही कामासाठी बाहेर होते. दरम्यान घरात कोणी नसल्याची संधी साधून धीरजने घरातील एका खोलीत गळफास घेतला. काही वेळाने वडील पुरुषोत्तम रोठे घरी परतले असता धीरज गळफास लावलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच गडचिरोली पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.



## संक्षीप्त





### लॉयड्स मेटल्स एंड एनर्जी लिमिटेड कडून कमलापूर एलिफंट कॅम्प येथील हत्ती प्रशिक्षण कार्यक्रमाला समर्थन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

अहेरी : कमलापूर एलिफंट कॅम्प येथे आयोजित करण्यात आलेला हत्ती प्रशिक्षण कार्यक्रम १७ फेब्रुवारी २०२६ ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमाचा उद्देश हत्ती आणि महावत यांच्या कौशल्यवृद्धीसोबत त्यांच्यातील समन्वय, सुरक्षितता आणि कार्यक्षमता वाढविणे हा होता. हा प्रशिक्षण कार्यक्रम Lloyds Metals and Energy Limited (LMEL) यांच्या कॉर्पोरेट एन्व्हायर्नमेंटल रिस्पॉन्सिबिलिटी (CER) उपक्रमांतर्गत राबविण्यात आला आणि त्यासाठी निधीही उपलब्ध करून देण्यात आला. प्रशिक्षण तज्ज्ञ महावत आणि पशुवैद्यकीय तज्ज्ञ डॉ. राजेश यांनी दिले, जे Teppakadu Elephant Camp, Mudumalai Tiger Reserve (तामिळनाडू) येथून आले होते. या प्रशिक्षणामध्ये आदेश देण्याची पद्धत, हत्तींची वर्तणूक प्रतिसाद, कंडीशनिंग तंत्र, मानवी पद्धतीने हाताळणी, शिस्त, वर्तणूक व्यवस्थापन तसेच आरोग्य तपासणी आणि निरीक्षण यांवर विशेष भर देण्यात आला. हा कार्यक्रम महाराष्ट्राचे प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य वन्यजीव संरक्षक श्री एम. एस. रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाराष्ट्राचे माजी PCCF (वन्यजीव) आणि LMEL चे सल्लागार श्री महिप गुप्ता यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आला. यामध्ये सिरोंचा वन विभागाचे उपवनसंरक्षक श्री नवकिशोर रेड्डी, LMEL चे महाव्यवस्थापक श्री अमिताव मलिक आणि LMEL चे उपव्यवस्थापक (वन्यजीव) श्री कुम्मारी स्वामी यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. कार्यक्रमाचे उद्घाटन कमलापूरचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर श्री गौरेश गौतम गडमाडे, प्रोबेशनरी रेंज फॉरेस्ट ऑफिसर श्री अनिरुद्ध माने आणि डॉ. नागेश्वर रामलाल चौहान यांच्या हस्ते वन विभागातील अधिकारी तसेच LMEL चे प्रतिनिधी श्री निक्षेपन गौड यांच्या समन्वयाने करण्यात आले. कमलापूर एलिफंट कॅम्पच्या विकासासाठी LMEL कडून सिरोंचा येथील वन विभागीय अधिकाऱ्यांना विकासकामांसाठी ₹३४.५३ लाखांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. याशिवाय कॅम्पमधील पायाभूत सुविधा आणि इतर सोयीसुविधांच्या उन्नतीसाठी कंपनीकडून थेट ₹४० लाख खर्च करण्यात येणार आहेत, ज्यामुळे या ठिकाणी इको-टुरिझमलाही चालना मिळणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप कमलापूर रेंज कार्यालयात आयोजित करण्यात आला. यावेळी सहाय्यक वनसंरक्षक (ACF) विष्णु वर्धन रेड्डी (IFS), रेंज फॉरेस्ट ऑफिसर गौतम गडमाडे, रेंज फॉरेस्ट ऑफिसर अनिरुद्ध माने तसेच वन विभागाचे कर्मचारी आणि कॅम्पमधील कर्मचारी उपस्थित होते. वन विभाग आणि LMEL यांच्या संयुक्त प्रयत्नातून हत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम होण्यासोबतच कमलापूर एलिफंट कॅम्पची कार्यक्षमता आणि आकर्षण वाढण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### जिल्ह्यात 545 गावांत संभाव्य टंचाई; चिखलदऱ्यातील 15 गावांचा समावेश

जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळा सुरू होताच पाणीटंचाईचा प्रश्न उफाळून येतो. यंदाही जिल्ह्यातील ५४५ गावांमध्ये संभाव्य पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे. त्यामुळे टंचाई निवारणार्थ जिल्हा परिषदेच्या ग्रामिण पाणी पुरवठा विभागाच्या वतीने १९ कोटी ७ लाख ५५ हजार रुपयांचा कृती आराखडा तयार केला आहे. टंचाई निवारणार्थ ७२२ उपाय योजना प्रस्तावित असून चिखलदरातील १५ गावांना सर्वाधिक झळ असल्याने तेथे टँकरने पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# साखरा येथील अवैध रेती उत्खनन प्रकरणी अखेर 13 दिवसांनंतर आंदोलन स्थगित

## प्रशासनाचे लेखी आश्वासन ; दोषींवर कारवाई न झाल्यास पुन्हा आंदोलनाचा इशारा

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गडचिरोली तालुक्यातील साखरा गावातील वैनगंगा नदी पात्रात सुरू असलेल्या कथित अवैध रेती उत्खननाच्या गंभीर प्रकरणाने अखेर प्रशासनाला हालचाल करायला भाग पाडले आहे. गेल्या १३ दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसलेल्या साखरा उपसरपंच तथा भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या जिल्हा महामंत्री अर्चना दिनेश बोरकुटे तथा माजी जिल्हा परिषद सदस्या निता साखरे यांनी प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आपले आंदोलन तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला. साखरा येथील वैनगंगा नदीपात्रात 'शेती घाट' या नावाखाली गेल्या पाच वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर रेती उत्खनन सुरू असल्याचा आरोप अर्चना बोरकुटे यांनी केला होता. संबंधित रेतीचा साठा सरकारी डेपोमध्ये करण्यात आल्याचा तसेच महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे ही कारवाई दीर्घकाळ सुरू असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला होता. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, संबंधित जमीन मालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या मंडळ अधिकारी व तलाठ्यांना तात्काळ निलंबित करावे, या प्रमुख मागण्यांसाठी १२ फेब्रुवारी २०२६ पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते.




### प्रशासनाची दखल; तांत्रिक चौकशीचे आदेश

▪ आंदोलनाला स्थानिक नागरिकांचा वाढता पाठिंबा आणि माध्यमांमधील प्रसिद्धी लक्षात घेता प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. तहसीलदार सागर कांबळे यांनी आंदोलनकर्त्यांना लेखी पत्र देत चौकशीची प्रक्रिया सुरू केल्याची माहिती दिली. पोर्ला मंडळ अधिकाऱ्यांकडून संबंधित शेती पाटाची प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व भूमी अभिलेख कार्यालयाकडून शेती घाट व वाळू डेपोमधील साठ्याची तांत्रिक मोजणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. २५ फेब्रुवारी रोजी सहाय्यक जिल्हाधिकारी, तहसीलदार तसेच आंदोलनकर्त्या अर्चना बोरकुटे आणि निता साखरे यांच्या उपस्थितीत मौजा साखरा येथील शेती घाटाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान नदीपात्रातील उत्खननाची स्थिती, साठवणूक केलेली रेती व महसुली नोंदी यांची प्राथमिक तपासणी करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

▪ नायब तहसीलदार चंदू प्रधान व ज्ञानेश्वर ठाकरे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर येऊन प्रशासनाकडील लेखी पत्र आंदोलनकर्त्यांच्या हाती दिले. तांत्रिक मोजणी अहवालाच्या आधारे दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट आश्वासन देण्यात आले. तहसीलदारांच्या पत्राचा मान राखून आणि चौकशी प्रक्रियेला संधी देत अर्चना बोरकुटे व निता साखरे यांनी आंदोलन तूर्तास स्थगित करण्याची घोषणा केली.

### पारदर्शक चौकशी न झाल्यास पुन्हा लढा

▪ आंदोलनकर्त्यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले की, "प्रशासनाच्या आश्वासनावर आम्ही विश्वास ठेवत आहोत; मात्र चौकशी पारदर्शक आणि निष्पक्ष झाली नाही, दोषींवर कारवाई टाळली गेली किंवा अहवाल दडपण्याचा प्रयत्न झाला तर आम्ही पुन्हा तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबू." गावकऱ्यांमध्येही या प्रकरणाबाबत मोठी उत्सुकता असून नदीपात्रातील बेकायदेशीर उत्खननामुळे पर्यावरणीय हानी, भूजलपातळीतील घट आणि शेतीवर होणारे दुष्परिणाम याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणात उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्याची मागणी केली आहे.

### प्रशासनासमोर मोठे आव्हान

▪ साखरा येथील रेती उत्खनन प्रकरण आता केवळ महसुली अनियमिततेपुरते मर्यादित न राहता पर्यावरणीय व कायदेशीर जबाबदारीचा प्रश्न बनला आहे. पुढील काही दिवसांत तांत्रिक मोजणी अहवाल सादर होणार असून त्यानंतर प्रशासनाची कारवाई कितपत ठोस होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, १३ दिवसांच्या उपोषणानंतर आंदोलन स्थगित झाल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील तणाव निवळला असला तरी, या प्रकरणाची सत्यता व दोषींवर होणारी कारवाईच पुढील परिस्थिती ठरवणार आहे.

### डीजेच्या कर्कश आवाजाने गर्भातील बाळाचा मृत्यू....!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

राजुरा : शहरातील माता मंदिर परिसरात डीजेच्या कर्कश आणि अतिमोठ्या आवाजामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणी बालकाचे वडील स्वप्नील लिपटे यांनी मंगळवारी (दि. २८) नगरपरिषदेत लेखी तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माता मंदिर वॉर्डात रात्री उशिरापर्यंत अतिशय मोठ्या आवाजात डीजे वाजवण्यात येत होता. लिपटे यांचे घर याच परिसरात असून, डीजेच्या तीव्र आवाजामुळे त्यांच्या गर्भवती पत्नी सुवर्णा यांना अस्वस्थता जाणवू लागली. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीदरम्यान गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले, असा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. डीजेच्या कर्कश आवाजामुळेच बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप करत लिपटे यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे.

या तक्रारीची दखल घेत नगराध्यक्ष अरुण धोटे यांनी पोलिस प्रशासनाला याबाबत कळविले आहे. दरम्यान, ठाणेदार सुमित परतेकी यांनी शहरातील सर्व डीजे मालकांना बोलावून नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश दिले असून, ध्वनीप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला आहे. या घटनेमुळे शहरात ध्वनीप्रदूषणाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून, नागरिकांनीही रात्रीच्या वेळी मोठ्या आवाजातील कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्याची मागणी केली आहे.



# गडचिरोली येथे गर्भाशय मुखाच्या कर्करोग तपासणी व उपचार शिबीर

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : महाराष्ट्र सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली यांच्या पुढाकाराने 'We Care & Cure' या विशेष उपक्रमाची अधिकृत सुरुवात करण्यात आली आहे. महिलांच्या आरोग्यासाठी आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची पूर्वलक्षणे ओळखून त्यावर वेळीच उपचार करण्यासाठी ही मोहीम राज्यभर राबवली जाणार असून, तिचा शुभारंभ गडचिरोली जिल्ह्यापासून करण्यात आला आहे. नेतृत्व: हा कार्यक्रम डॉ. वर्षा लहाडे (जिल्हा शल्य चिकित्सक, गडचिरोली व अध्यक्ष, HPV व्हॅक्सिनेशन, सर्व्हायकल आणि ब्रेस्ट कॅन्सर कमिटी, IMA राज्य) आणि डॉ. ज्योती सूळ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. मान्यवर उपस्थिती: या कार्यक्रमात मंगेश चिवटे (OSD, उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष), डॉ. शशीकांत शंभरकर (उपसंचालक, नागपूर), डॉ. मंजूषा गिरी (अध्यक्ष, IMA महाराष्ट्र), डॉ. संतोष कुलकर्णी आणि डॉ. विक्रांत देसाई (सचिव, IMA) यांसह अनेक मान्यवरांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे (VC) सहभाग नोंदवला. जागरूकता आणि आवाहन: डॉ. मंजूषा गिरी यांनी महिलांना आवाहन केले की, गर्भाशय मुखाचा कर्करोग योग्य वेळी निदान झाल्यास पूर्णपणे बरा होऊ शकतो, त्यामुळे महिलांनी भिती किंवा लाज न बाळगता नियमित तपासणी करून घ्यावी. तसेच, डॉ. वर्षा लहाडे यांनी सांगितले की, ही संकल्पना प्रत्येक रुग्णाला संवेदनशील, गुणवत्तापूर्ण आणि वेळेवर आरोग्य सेवा देण्यासाठी कटीबद्ध आहे. उपचारात्मक कार्यवाही: या शिबिरामध्ये गडचिरोली, चामोर्शी, धानोरा आणि आरमोरी येथील १३ VIA पॉझिटिव्ह महिलांची तपासणी करून त्यांच्यावर डॉ. वर्षा लहाडे आणि स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रशांत आखाडे यांच्या देखरेखीखाली यशस्वी उपचार करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रेरणा राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. छाया उईके (अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक) यांनी मानले. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.




### मोकाट डुकरामुळे भीषण अपघात, नगरसेवक मुक्तेश्वर काटवे यांचा दुर्दैवी मृत्यू..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**



गडचिरोली : शहरातील कारगिल चौक परिसरात शुक्रवारी (दि. 27) रात्री सुमारे 9.45 ते 10 वाजताच्या सुमारास घडलेल्या भीषण अपघातात गडचिरोली नगरपरिषद नगरसेवक तथा आरोग्य सभापती मुक्तेश्वर काटवे (वय 55) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अचानक रस्त्यावर आडवे आलेल्या मोकाट डुकरामुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटून हा अपघात झाला. या घटनेने शहरात शोककळा पसरली असून, मुक्तेश्वरजी काटवे सारखे सर्वसामान्य जनतेच्या मदतीसाठी नेहमी तत्पर असनारे मनमिळाऊ आणि प्रेमळ व्यक्ती हरपल्याने सर्वत्र शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, देवराव होळी यांच्या स्वागत समारंभानंतर इंदिरा गांधी चौक येथून मुक्तेश्वर काटवे दुचाकीने घरी निघाले होते. कारगिल चौक परिसरात अचानक डुक्कर आडवे आल्याने दुचाकी घसरली. यात काटवे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. अपघातानंतर उपस्थित नागरिकांनी तात्काळ मदत करत त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले; मात्र डोक्याला झालेल्या गंभीर मारामुळे व अतिरक्तस्त्रावामुळे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

#### गडचिरोली शहरात मोकाट डुकरांचा प्रश्न ऐरणीवर

▪ शहरात मोकाट डुकरांचा हैदोस वाढत असून, अपघातांच्या घटना सातत्याने घडत आहेत. मोकाट जनावरांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांकडून अनेक दिवसांपासून होत असतांनाही नगर परिषदेचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप आहे. आता थेट नगरसेवकाचाच मोकाट डुकरामुळे मृत्यू झाल्याने संताप व्यक्त केला जात असून, आता तरी नगर परिषद जागी होणार का, की आणखी अपघातांची वाट पाहणार? असा सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

# पीएम श्री जवाहरलाल नेहरु शाळा रामनगर, गडचिरोली शाळेची उज्वल यशाची परंपरा कायम...!

## एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील ३० विद्यार्थी उत्तीर्ण

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : नगर परिषद गडचिरोलीच्या पीएम श्री जवाहरलाल नेहरु शाळेतील तब्बल ३० विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत उत्तीर्ण झाले. जिल्ह्यातील एका शाळेतील सर्वात अधिक संख्येने या परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा मान नप शाळेने मिळविला आहे.

जातीनिहाय आरक्षण असणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अनेक कल्याणकारी शिष्यवृत्ती योजनांचा दरवर्षी लाभ मिळत असतो. परंतु आर्थिक दुर्बल घटकातील प्रतिभावंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी देशपातळीवर एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास व शिक्षण मंत्रालय नवी दिल्ली यांचे मार्फत घेण्यात येथे. आर्थिक मागास विद्यार्थ्यामधुन प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रज्ञेची जोपासना, तसेच त्यांचे बारावीपर्यंत शिक्षण पूर्ण व्हावे हा या योजनेचा गाभा आहे. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षा ही इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासनाची एक महत्वपूर्ण योजना आहे. या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल (वार्षिक उत्पन्न ३.५ लक्षपर्यंत) आणि सरकारी/अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना नववी ते बारावीपर्यंत प्रतिवर्ष १२००० रुपये शिष्यवृत्ती मिळते.



या परीक्षेत शाळेतील एकुण ३१ विद्यार्थी सहभागी झाले होते त्यापैकी ३० विद्यार्थ्यांनी हि परीक्षा उत्तीर्ण केली. यात कु. राधीका चापले, दक्ष वरगंटीवार, कु. संभवी दहीकर, कु. तनया उंदिरवाडे, मनिष नागोसे, पारस खेवले, कु. हर्षाली मुनघाटे, कु. गारवी नगराळे, कु. राशी चौधरी, कु. नविका वाढई, कु. नव्या मल्लेलवार, कु. काव्या हेमके, अभिशांत कोवे, आदित्य भोयर, दिप गायकवाड, रेहांश माटेटवार, कु. तेजस्वी बोदलवार, शिवाजी उसेंडी, कु. श्रावणी सिडाम, कु. निराली बारसागडे, अमित बुरांडे, कु. प्रांजल भोयर, प्रथमेश नवघरे, कु. क्रितीका चापले, कु. आरोशी नरोटे, कु. कृतिका गुरनुले, हुमाज पठाण, कु स्वरा धोटे,कु. स्वीटी उसेंडी व आयुष लोणबले या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

या उल्लेखनीय यशामागे शाळेचे मुख्याध्यापक सुधीर गोहणे, विषय शिक्षक महेंद्र शेडमाके, स्वप्नील मेश्राम, कु. शर्मिला मने यांचे नियोजनबध्द मार्गदर्शन, सातत्यपुर्ण पेपर सराव, परीश्रम व सातत्यपुर्ण प्रयत्न मोलाचे ठरले आहेत. विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे समर्पण आणि पालकांचा पाठिंबा या त्रिसुत्रीमुळेच हे यश शक्य झाले आहे. नप शाळेतील विद्यार्थी गुणवत्तेच्या बाबतीत कोणत्याही शाळांपेक्षा कमी नाहीत हे या यशातून सिद्ध झाले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल नगराध्यक्ष सौ. प्रणोती निंबोरकर, उपाध्यक्ष श्री. नितीन चरडे, शिक्षण सभापती श्री. हर्षल गेडाम, मुख्याधीकारी श्री. सुर्यकांत पिदुरकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ. दिपाली धोटे तथा सर्व सदस्य व पालकांनी अभिनंदन केले.




## पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




खा... णि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता... की १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### न...

जि... प्रतिनिधी

- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.

### अमरावती

जिल्हा प्रतिनिधी

- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरुड, इतर

### अकोला

जिल्हा प्रतिनिधी

- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ

जिल्हा प्रतिनिधी

- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.


### बुलढाणा

जिल्हा प्रतिनिधी

- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर

- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन

संगणक चालक पेज डिझायनर.

- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा.

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यांनी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474
अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291